

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान सर्वत्र पूज्यते।
स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine January 2026 - Pages - 52

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे          कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७७ * अंक ३ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेच्या मुक्तांगण इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे, शाळेचे माजी विद्यार्थी मा. श्री. आशुतोष कुलकर्णी
(कलेक्टर आणि जिल्हा दंडाधिकारी, रायगडा, ओरिसा)
यांचे स्वागत करताना संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
समवेत डावीकडून संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. आनंद कुलकर्णी आणि श्री. सुनील रेडेकर,
डॉ. नेहा आशुतोष कुलकर्णी आणि प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी

## ❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ❊




दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी पूर्व प्राथमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध लेखिका व कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे




दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी प्राथमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्या सुप्रसिद्ध अभिनेत्री सुरभी हांडे यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे

## ❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ❊



दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. अरुण पी. गरूड (रिटायर्ड एअर मार्शल, पीव्हीएसएम, व्हीएम) यांचा सत्कार करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत संचालक श्री. सुनील रेडेकर, डॉ. राजेंद्र कांबळे आणि प्रा. राजेंद्र कडुसकर



दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी माध्यमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. हर्षद घुले, डेप्युटी कलेक्टर, पुणे यांचा सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, समवेत संचालक श्री. रमेश कुलकर्णी व श्री. सुनील रेडेकर, सौ. स्वाती घुले, मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक व सौ. शिल्पा चितारे

संपादकीय

# मातृशक्ती

।। जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ।।

आपल्या रघुवंश या महाकाव्याच्या प्रारंभी कवी कुलगुरू कालीदास संपूर्ण चराचराचे अधिपती असलेल्या माता पार्वती आणि भगवान शंकराला अभिवादन करतात. अर्थ आणि वाणी - वाचा यांच्या अव्दैताप्रमाणे असलेल्या या जोडप्याचा महिमा वर्णन करताना कालीदास भगवान शंकराआधी पार्वतीमातेचा उल्लेख करून जणू त्या स्त्रीरूपी मातृशक्तीला वंदन करतात. तोच आदर्श डोळ्यांपुढे ठेवून या नववर्षाच्या प्रारंभीच्या संपादकीयात मी मातृशक्तीला नमन करतो.

गणितामध्ये एक अधिक एक म्हणजे दोन होत असले तरी, सामाजिक स्तरावर मात्र स्त्री आणि पुरुष या दोघांमुळे एका समाजाची निर्मिती होते. मानवी समाज जर निकोप आणि सशक्त करायचा असेल तर, समाजात प्रत्येकाने स्त्रीशक्तीचा आदर राखला पाहिजे, केला पाहिजे तरच समाजाची प्रगती आणि उन्नती होऊ शकते हे तत्त्व लक्षात घेऊनच आपल्याकडे पूर्वापार सांगितले जाते की,

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । '

जेथे स्त्रीत्वाची पूजा होते, तिचा आदर केला जातो तेथे देवतांची वस्ती असते. वस्तुतः स्त्री आणि पुरुष ही एकाच समाजरथाची दोन चाकं आहेत. निसर्गतःच स्त्रीला लाभलेल्या सृजन क्षमतेमुळे ती खरं तर, एका अर्थाने सृष्टी निर्माण करणारी आहे. म्हणूनच कवी बी या आदीशक्तीबद्दल सांगतात,

खरे सारे पण मूळ महामाया,
आदी पुरुषाची कामरूप जाया,
पहा नवलाई तिच्या थोरवीची,
सृष्टिशृंगारे नित्य नटायाची

या नारीशक्तीने आपल्या सर्जनशीलतेने संपूर्ण विश्वाला एक चांगला आकार देण्याचा प्रयत्न केला.

आपल्या उत्तुंग चारित्र्याने आणि मर्यादापालन तत्त्वाने श्रीरामाने समाजापुढे कर्तव्याचा आणि आदर्शाचा परिपाठ ठेवला. भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगून सर्वसामान्य माणसाला मुक्तीचा मार्ग दाखवला. मध्ययुगात संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून प्रापंचिकांना जीवन श्रेयाची ओळख करून दिली. तर,

'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा
सामर्थ्य आहे चळवळीचे मोठे ।'

असा संदेश देत

रामदास स्वामींनी किंवा वारकरी संप्रदायाने प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालत एक समतेच्या तत्त्वावर आधारित समाज निर्मिती करण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी थंडगार मातीच्या गोळ्याप्रमाणे पडलेल्या समाजमानसात एक नवा जोष आणि स्वाभिमान निर्माण केला.

आधुनिक काळात लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या तत्त्वांवर आधारित सामाजिक तत्त्वज्ञान आपल्या समाजात रुजवले.

ही परंपरा संपूर्ण भारतात आणि विश्वात रुजलेली आपल्याला दिसते. श्रीरामकृष्ण परमहंस, लाला लजपत राय, बिपीनचंद्र पाल किंवा विज्ञान आणि तंत्र शास्त्रातील दिग्गज डॉ. होमी भाभा, श्री विश्वेश्वरय्या, डॉ. रमण, मार्टिन ल्यूथर किंग, अब्राहम लिंकन आदी विविध ज्ञान आणि कार्यक्षेत्रातल्या धुरीणांनी मानवी समाजाला परिपूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला. या सर्वांच्या कर्तृत्वातून एका दृष्टिने स्त्रीत्वाच्याच कर्तृत्वाचा साक्षात्कार होतो. कारण 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी, '

आजच्या शिक्षकी पेशात किंवा इतरही कार्यक्षेत्रात स्त्रीकर्तृत्वाने उत्तुंग भरारी घेतली आहे ती पाहून मन स्तिमित होते. आदराने झुकते आणि नव कवितेचे जनक श्री. बा. सी. मर्ढेकर यांच्या शब्दात म्हणावेसे वाटते,

**' थांब उद्याचे माऊली तीर्थ पायाचे घेईतो '**

आपणा सर्वांना मकरसंक्रांतीच्या आणि प्रजासत्ताकदिनाच्या शुभेच्छा !

दि. २८ डिसेंबर २०२५
दुर्गाष्टमी - शांकभरीदेवी नवरात्रोत्सवारंभ

# लोकशाहीतील स्वातंत्र्य

आपल्या देशात लोकशाही राज्य-पद्धतीचा स्वीकार आपण केला; परंतु लोकशाही समाज-व्यवस्थेची मूलभूत तत्त्वे अद्याप समाजात रुजलेली नाहीत. इंग्लंडमध्ये कित्येक वर्षे लोकशाहीचा विकास होत आलेला आहे. ती सर्व प्रगती आत्मसात करायला आपल्याला काही काळ लागेल. बुद्धिपुर:स्सर व प्रसंगा-प्रसंगाने लोकशाहीची प्रधान तत्त्वे लोकांना शिकवायला पाहिजेत.

विचार स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, मत-स्वातंत्र्य, वैयक्तिक-स्वातंत्र्य आणि प्रचार स्वातंत्र्य यांच्यावर लोकराज्याची इमारत आधारलेली आहे. पुष्कळ लोक हे स्वातंत्र्य स्वत:पुरते मान्य करतात; पण इतरांना ते द्यायला तयार नसतात. म्हणजे लोकशाहीच्या नावाखाली ते हुकूमशाहीचा पुरस्कार करीत असतात. अडाणी लोकांना - यांच्यात सुशिक्षित आणि अशिक्षित दोघेही येतात - हा फरक आकलन होत नाही.

स्वत: स्वातंत्र्य मागणाराने तेच स्वातंत्र्य इतरांनाही द्यायला पाहिजे. इतरांचे मत-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, प्रचार-स्वातंत्र्यही मान्य केले पाहिजे. दोन किंवा अधिक मतप्रवाह, अनेक पक्ष, अनेक ध्येयवाद-हा लोकशाहीचा पाया आहे. विरोधी पक्षाची जोपासना लोकराज्यात केली जाते. विरोधी पक्षाच्या प्रमुखाला राज्यमंत्र्यासारखा पगारही असतो.

एका प्रसिद्ध इंग्रज विचारवंताचे एक वाक्य मार्मिक आहे. तो विरोधकाला उद्देशून म्हणतो-''तुझ्या विधानातील एक अक्षरही मला मान्य नाही. तरी पण ते विधान करण्याचा तुझा हक्क आहे. आणि त्या तुझ्या हक्काच्या रक्षणाकरता मी प्राण जाईपर्यंत लढेन.'' किती उदात्त कल्पना आहे ही मत-स्वातंत्र्याची! या देशातल्या किती पुढाऱ्यांना, किती अनुयायांना यातले मर्म आकलन झाले आहे!

विरोधी विचारांच्या पक्षांना, व्यक्तींना, मतांना, वृत्तपत्रांना, प्रचाराला हिरिरीने नेस्तनाबूत करू इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांना आणि अनुयायांना सतत विचारावेसे वाटते की, तुम्हाला लोकराज्याची मूलभूत तत्त्वे कळली आहेत का? मान्य आहेत का?

**डॉ. ग. श्री. खैर (नोव्हेंबर १९५७)**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्र. प्राचार्य : डॉ. ज्ञानेश्वर दाते**

## संविधान दिन उत्साहात साजरा

बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीस प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते संविधानाची उद्देशिका आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, करण्यात आली. शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनीही संविधानाची उद्देशिका आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देशिकेचे वाचन करवून घेतले. एम. सी. व्ही. सी. विभागातील अध्यापक श्री. मल्लिनाथ वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना संविधान परीक्षेसंदर्भात माहिती दिली. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्त्व आणि माहिती सांगितली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव 'घर घर संविधान' या कार्यक्रमांतर्गत शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार प्रशालेतील विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली आणि घोषणा म्हणवून घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे फलकलेखन श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

## निरोप समारंभ

विद्यालयाचे प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे हे नियत वयोमानानुसार शुक्रवार दि. ३१.१०.२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, श्री. व्ही. पी. गावडे यांचे आप्तेष्ट, स्नेही, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी आपले मनोगत व्यक्त करून श्री. व्ही. पी. गावडे यांना सेवानिवृत्तीच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

## पालक - शिक्षक सभा

शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या वर्षातील दुसरी पालक - शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे आयोजन प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते व पालक - शिक्षक संघ समितीप्रमुख व अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. ही पालक - शिक्षक सभा प्रथम इ. ५वी ते १० वी अशी सर्व वर्गशिक्षकांनी वर्गवार घेतली. नंतर ही पालक - शिक्षक सभा एकत्रितही घेण्यात आली. या सभेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. यानंतर प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना व इतर विविध विषयांवर चर्चा केली. पीपीटी च्या माध्यमाद्वारे उपस्थित पालकांना प्रशालेत घेतलेल्या सर्व उपक्रमांची माहिती देण्यात आली. या पीपीटी तयार करण्याचे काम आणि फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात

आला. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले.

**तुलसी पूजनाचे महत्त्व**

शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी योगवेदांत सेवा समिती, रास्ता पेठ, पुणे यांच्याकडून प्रशालेतील विद्यार्थ्यांना तुलसी पूजनाचे महत्त्व सांगण्यात आले. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते तुलसीच्या रोपाचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रशालेतील इ. ५ वी ते १०वी चे विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**चित्रकला स्पर्धा**

पुणे सराफ असोसिएशनच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सारसबाग येथे जिल्हा पातळीवर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेत विद्यालयातील इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला चित्रकला पेपर, प्रशस्तीपत्रक, खाऊ देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना जादूचे प्रयोगही दाखवण्यात आले. या प्रसंगी पुणे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष एफ. एन रांका यांच्या हस्ते प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

**शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत शाळा तपासणी**

बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी शासनातर्फे इन्स्पेक्शन घेण्यात आले. सन २०२४ - २५ मध्ये प्रशालेने अंतर्गत मूल्यमापनासाठी १२८ मानकांपैकी एकूण १२१ मानके पुराव्यासह अपलोड केली होती. अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे प्रशालेची निवड सन २०२५ मध्ये बाह्य मूल्यांकनासाठी करण्यात आली. त्यानिमित्ताने शासनाने शालेय तपासणी करण्यासाठी पुणे म. न. पा. शिक्षण विभाग प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. सुमन बगाड, म. न. पा. शाळा क्र. ४० जी येथील मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. सुरेखा नरके, शिवाजी मराठा विद्यालयाच्या उपशिक्षिका सौ. स्मिता खोपडे, म. न. पा. शाळा क्र. ४० जी इंग्रजी माध्यमाचे तंत्रस्नेही शिक्षक श्री. किरण खंडागळे यांचा सहभाग असलेले पथक पाठवले होते. या सर्व अधिकाऱ्यांनी शालेय तपासणी केली. या तपासणीमध्ये प्रशालेस एकूण ४८४ पैकी ४२४ गुण प्राप्त झाले.

***

## डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

**पूर्व प्राथमिक विभाग**

**दिल्याने आनंद वाढतो (शेअरिंग इज केरिंग)**

दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी 'शेअरिंग इज केअरिंग' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या मित्र मैत्रिणींसोबत अनेक वस्तूंची देवाणघेवाण केली. यातून त्यांना एकमेकांना मदत करण्याचे फायदे समजले. यामध्ये शिक्षकांनी अनेक प्रकारच्या नाटुकल्या सादर करून विद्यार्थ्यांना ही शिकवण दिली.

**वार्षिक क्रीडा स्पर्धा**

दि. १ ते ३ डिसेंबर २०२५ या कालावधीत वार्षिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यात धावण्याची शर्यत, वस्तूचे संतुलन करून चालणे, उडी मारणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### बालदिन

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दोन्ही सत्रांमध्ये शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी 'पपेट शो' सादर केला. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी बालदिनानिमित्त चित्रं रंगविली.

### चित्रकला स्पर्धा

शुक्रवार दि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी शिशु गटातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर रीतीने चित्रं रंगविली. सौ. गिरिजा वाशीकर व सौ. केतकी राजभोज यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

### सुंदर हस्ताक्षर स्पर्धा

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केले होते. परीक्षक म्हणून सौ. तेजस्विनी आठल्ये व सौ. दिव्या गवळी यांनी काम पाहिले.

### ओपन डे

शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी 'ओपन डे' आयोजित केला होता. या दिवशी पालकांना प्रथम सत्र परीक्षेचे पेपर व रिपोर्ट कार्ड देण्यात आले. तसेच पुढील सत्रात घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या स्पर्धा, स्नेहसंमेलन व अभ्यासाविषयी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. पालकांच्या शंकांचे निरसन केले गेले. त्यानंतर सर्व पालकांनी प्राथमिक विभागाने आयोजित केलेल्या 'क्युरीयस २०२५' या प्रदर्शनाला भेट दिली.

## प्राथमिक विभाग

### वार्षिक प्रदर्शनाचे आयोजन

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी वार्षिक प्रदर्शन 'क्युरिअस २०२५' मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्राध्यापक व समन्वयक, आयसर संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते झाले. पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संयोजिका सौ. स्नेहल गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांनी प्रकल्पांचे निरीक्षण करताना विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या प्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, श्री. सुनील रेडेकर आणि श्री. रमेश कुलकर्णी, पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण 'स्मार्ट बोर्ड'वर करण्यात आले. पालकांनाही 'यु ट्यूब लिंक'द्वारे या उद्‌घाटन सोहळ्यात सहभागी होता आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. केतकी पुजारी यांनी केले.

## माध्यमिक विभाग

### सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे सत्राचे आयोजन

दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी पिंपरी येथे सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे एक सत्र आयोजित करण्यात आले होते. मेजर जनरल सुभाष विश्वराव आणि कर्नल राजनिष गेरोला यांचे 'सशस्त्र दलात सामील व्हा, राष्ट्राची ताकद व्हा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. इ. ८वी आणि ९वीतील दोन आणि महाराष्ट्र आर्मी विंग बटालियनचे ४० कॅडेट्स यावेळी उपस्थित होते.

### 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचे सामूहिक सादरीकरण

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेमध्ये 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन

साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. कविता चिंता यांनी या गाण्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करणारा एक संक्षिप्त आढावा सादर केला. संगीत शिक्षिका कु. वैष्णवी उदावंत आणि सौ. मोहना बाभळे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय गीताच्या सामूहिक सादरीकरणात सहभागी झाले.

* दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतराळ मोहिम कार्यक्रमातील सहा निवडक विद्यार्थ्यांना इस्त्रोच्या सहकार्याने स्पार्क इंडियाने आयोजित केलेल्या एका सत्रामध्ये सादरीकरण करण्याची संधी मिळाली. यावेळी या विद्यार्थ्यांनी स्वतःचे डिझाईन केलेले पॅरॅशूट मॉडेल प्रदर्शित केले आणि तीनशे ग्रॅम वजनासह सॉफ्ट लँडिंग यशस्वीरित्या साध्य केले.

* दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे एका हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शैक्षणिक सहलीचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी इरावती कर्वे मानववंशशास्त्र संग्रहालयास भेट दिली आणि आपल्या समृद्ध इतिहास आणि संस्कृतीबद्दल जाणून घेतले. यावेळी विद्यार्थ्यांबरोबर दहावीच्या वर्ग शिक्षिका सौ. माधुरी शिंदे उपस्थित होत्या.

**बालदिन**

दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेमध्ये बालदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थी कु. राजवीर जाधवराव इ. १०वी ब या विद्यार्थ्याने पंडित चाचा नेहरूंवर एकपात्री अभिनयाचे सादरीकरण केले. संगीत गटाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गाण्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

* दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेच्या इंटरॅक्ट क्लबने रोटरी क्लब ऑफ पुणे, कात्रज यांच्या सहकार्याने शाळेच्या परिसरात ई - कचरा आणि जुने कपडे संकलन मोहिमेचे यशस्वीरित्या आयोजन केले. या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शाळेचे कर्मचारी सक्रिय सहभागी झाले होते.

* दि. १५ आणि १६ नोव्हेंबर २०२५ रोजी हॉटेल रामी ग्रँड, पुणे येथे गोएथ संस्था यांच्यातर्फे उच्च कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जर्मन भाषेचा अभ्यास करणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत 'कायनेटिक आर्ट', 'मेक अ मूवी', 'लोगो बायोमायमेटिक्स' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

**वार्षिक प्रदर्शन IGNITE २०२५**

दि. १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ रोजी 'IGNITE - २०२५' हे वार्षिक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी नासा हनीवेल विज्ञान आणि तंत्रज्ञान कम्युनिकेशन विभागाच्या स्पेस एज्युकेटर सौ. लीना बोकील या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिक्षिका सौ. तन्मया सहस्रबुद्धे यांनी करून दिला. यावेळी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, श्री. सुनील रेडेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख डॉ. सौ. स्वाती निकम, माध्यमिक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे, सौ. विजया काळे तसेच शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या प्रदर्शनात मराठी, इंग्रजी, हिंदी, जर्मन, संस्कृत या भाषांची वेगवेगळी दालने होती. यामध्ये विद्यार्थ्यांनी या सर्व भाषेतील विविध साहित्य आणि संस्कृती या विषयावर प्रकल्प तयार केले होते. तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान, गणित, अवकाश-खगोलशास्त्र, डिजिटल भारत, आत्मनिर्भर भारत, समुपदेशन कॉर्नर, कला, हस्तकला आणि मेंदी कॉर्नर यासारखे विषय होते. या प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे युनेस्कोने ऐतिहासिक वारसा स्थळे म्हणून जाहीर

केलेल्या शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांच्या प्रतिकृती विद्यार्थ्यांनी हुबेहूब तयार केल्या होत्या. तसेच 'Curiosity Matters' या पुस्तकाचेही अनावरण यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता दाखवणाऱ्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रकल्पामध्ये त्यांचे समर्पण, सर्जनशीलता आणि त्यांची नाविन्यपूर्णता दिसून आली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी कलाकारांच्या मेहनतीचे कौतुक केले. सौ. श्रद्धा लाळे यांनी आभार प्रदर्शन केले.

**करियर कौन्सिलिंग या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थी आणि पालकांसाठी करियर कौन्सिलिंग व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सुप्रसिद्ध करियर काऊंसेलर श्री. विवेक वेलणकर यांना यावेळी आमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना विज्ञान, वाणिज्य, कला आणि व्यावसायिक अशा विविध शैक्षणिक प्रवाहांसह त्यांच्याशी संबंधित करिअर विषयी तसेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स' या उदयोन्मुख क्षेत्राबद्दल देखील मार्गदर्शन करण्यात आले. दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी माध्यमिक विभागातील २७ विद्यार्थ्यांनी शिक्षिका सौ. विद्या सालेहित्तल यांच्यासमवेत ज्योतिर्विद्या परिसंस्था, टिळक रोड, पुणे यांनी आयोजित केलेल्या रात्रीच्या तारा पाहण्याच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. हा कार्यक्रम नसरापूर येथील 'मनाली ॲग्रो फार्म' येथे आयोजित करण्यात आला होता. येथील स्वयंसेवकांनी रात्रीच्या आकाशात वेगवेगळ्या वेळी दिसणारी वेगवेगळी नक्षत्रं, तारे, ग्रह तेजोमेघ आणि एड्रोमेडा आकाशगंगा विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. विश्वाच्या विशालतेमुळे आणि त्यातील असलेल्या रहस्यामुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. यावेळी तज्ज्ञांनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा आणि तारा चर्चासत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

**ड्युक्स नोज येथे ट्रेकचे आयोजन**

दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेच्या ॲडव्हेंचर क्लब मधील इ. ७ वी ते १० वीच्या २५ विद्यार्थ्यांनी लोणावळा जवळील ड्युक्स नोज (नागफणी) येथील ट्रेक यशस्वीरित्या पूर्ण केला.

**अभिनंदनीय**

✻ पुणे जिल्हा क्रीडा परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'रिले' या क्रीडा प्रकारात १७ वर्षाखालील मुलींच्या गटात शाळेच्या कु. भूमी देशपांडे, कु. मनाली गोतारणे, कु. सई झरगड या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांची राज्यस्तरीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड झाली.

✻ कु. ऑस्टिन नवघरे या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय स्पर्धेमधील 'किक बॉक्सिंग' या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

✻ दि. ५ ते ११ नोव्हेंबर २०२५ रोजी तामिळनाडू येथे घेण्यात आलेल्या सिलंबम या क्रीडा प्रकारासाठी विद्यार्थिनी कु. अर्पिता खर्डे इ. ८वी क हिने राष्ट्रीय पातळीवरचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. कु. अर्पिता खर्डे हिने 'मिडल स्टिक' या क्रीडा प्रकारामध्ये सुवर्णपदक आणि 'सिंगल स्टिक' या प्रकारामध्ये रजत पदक प्राप्त केले. अर्पिताची आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. त्याबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन!

✻ विद्यार्थी कु. रोहन पाटोळे, इ. ८ वी क या विद्यार्थ्याने रंगोत्सव या स्पर्धेत सहभागी घेऊन रजत पदक प्राप्त केले.

✻✻✻

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

❊ अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमातील कु. जय मनोहर हरे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यापीठ पातळीवर ८ वा क्रमांक मिळवून उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी केली आहे. सन २०१९ अभ्यासक्रम नमुन्यानुसार शिक्षण घेत असलेल्या कु. जय मनोहर हरे याने ९.५२ CGPA प्राप्त केला आहे. कु. जय हरे याचे हे यश त्याच्या सखोल ज्ञान, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक असून, त्याला विद्यापीठातील अग्रगण्य विद्यार्थ्यांमध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

❊ शाखेची पदवीधर श्रीनिधी बेदरकर यांची प्रतिष्ठित भारतीय विज्ञान संस्था (IISc), बेंगलोर येथील इलेक्ट्रॉनिक प्रॉडक्ट डिझाइन या एम. टेक. अभ्यासक्रमासाठी जनरल श्रेणीत प्रोव्हिजनल प्रवेशासाठी निवड झाली आहे. GATE २०२५ परीक्षेत त्यांनी ऑल इंडिया रँक २३६ मिळवून ७५२ स्कोअर प्राप्त केला आहे. ही प्रवेश ऑफर IISc च्या इलेक्ट्रॉनिक सिस्टिम्स इंजिनिअरिंग विभागाकडून देण्यात आली असून, COAP २०२५ पोर्टलद्वारे आवश्यक औपचारिकता पूर्ण करून तसेच IISc च्या सूचनांनुसार पुढील प्रवेश प्रक्रिया त्यांना पूर्ण करावी लागणार आहे.

❊ प्रा. वैशाली गोंगणे यांनी त्यांच्या 'Artificial intelligence-based framework for analysis, detection and moderation of social media content' या कामासाठी कॉपीराइट नोंदणी करून घेतली आहे.

❊ प्रा. महेश पा. पोतदार यांनी SGGS इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड येथून पीएच. डी. पूर्ण केली आहे. त्यांनी नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये तीन शोधनिबंध प्रकाशित केले असून, एका आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केला आहे. त्यांचे संशोधन क्षेत्र बायोमेडिकल इमेज ॲनालिसिस आहे.

### सामंजस्य करार

विभागाने एम्बेडेड सिस्टिम्स व ऑटोमेशन क्षेत्रात AMOTECH सोबत सुधारित सामंजस्य करार (MoU) यशस्वीरीत्या केला आहे. हा करार संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि फॅकल्टी कोऑर्डिनेटर प्रा. संगीता बावकर यांच्या समन्वयाने साकारला गेला. या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, कौशल्य विकास, इंटर्नशिप, कार्यशाळा तसेच उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव मिळेल. यामुळे उद्योग-शिक्षण सहकार्य अधिक दृढ होईल आणि प्रायोगिक शिक्षणाला नवीन चालना मिळेल.

## इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग

### एनआयटीटीआर, भोपाळ आयोजित कार्यशाळेत सहभाग

प्रा. नीता शिरसाट आणि प्रा. शुभांगी देशपांडे यांनी दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान एनआयटीटीआर भोपाळ द्वारे आयोजित 'सीडीएई-५ निकाल-आधारित शिक्षण आणि अभ्यासक्रम' या विषयावरील कार्यशाळा पूर्ण केली.

### प्रशिक्षणात सहभाग

❊ प्रा. एन. आर. सोनावणे यांनी श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या मेकॅनिकल, संगणक, ई अँड टीसी विभागाने आयोजित केलेल्या दि. ८ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'अभियांत्रिकी अनुप्रयोगांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगमधील अलिकडचा विकास' या विषयावर एआयसीटीई - आयएसटीई मंजूर दोन आठवड्यांचा

अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केला.

❋ प्रा. के. एस. बाळबुधे आणि प्रा. एस. व्ही. आसलेकर यांनी दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान 'शैक्षणिक पद्धतींमध्ये परिवर्तनासाठी आधुनिक तत्त्वे' या विषयावरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला. व्हीआयटी, पुणे येथील संगणक अभियांत्रिकी विभाग (सॉफ्टवेअर अभियांत्रिकी) आणि आयईईई पुणे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

**❋ पेटंट मंजूर**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या 'Auṣatra – Automated Drug Dispensing Machine' या प्रकल्पास भारत सरकारच्या पेटंट, डिझाईन्स व ट्रेडमार्क नियंत्रक कार्यालयाकडून डिझाईन पेटंट मंजूर झाले आहे. ही पेटंट नोंदणी संस्थेच्या नावावर करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी डॉ. मनमोहन एम. भूमकर आणि प्रा. शुभांगी आनंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. कु. प्रथम पालेकर, कु. साहिल सोंडकर, कु. अथर्व बोऱ्हाडे, कु. महेश आकीम, कु. उत्कर्ष अग्रवाल, कु. अथर्व अंधारे, कु. राजस नंदगांवकर व कु. क्षमिता माने या विद्यार्थ्यांनी प्रकल्प यशस्वीरीत्या साकारला. सदर यश विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्ती व नवोन्मेषी कार्याचे प्रतीक आहे. या यशाबद्दल संचालक श्री. सुनील रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे यांनी अभिनंदन केले.

**❋ प्रा. संकेत चिक्शे यांना टॉप परफॉर्मिंग मेंटॉर पुरस्कार प्राप्त**

प्रा. संकेत चिक्शे यांना एनपीटीईएलच्या जुलै - डिसेंबर २०२५ सत्रातील 'Product Design and Development' या अभ्यासक्रमासाठी 'Top Performing Mentor Certificate' प्रदान करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमात एकूण ४९ मेंटी सहभागी झाले होते. त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक मिळवले, १९ विद्यार्थ्यांनी 'एलिट' श्रेणी प्राप्त केली, तर १२ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. संकेत चिक्शे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

**❋ औद्योगिक भेट**

डॉ. पी. जी. कुलकर्णी आणि प्रा. सी. आर. मोरे यांनी दि. २ डिसेंबर २०२५ रोजी सिग्मा इलेक्ट्रिक मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन, चाकण येथे भेट दिली. या भेटीदरम्यान तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, प्रकल्प कार्य व प्लेसमेंटच्या संधी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने ही भेट अत्यंत उपयुक्त ठरली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक अनुभव व रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स विभाग

❋ डॉ. मीनाक्षी अत्रे यांना Google कंपनी मध्ये 'AI in Education: Shaping the Future of Learning and Employability' या विषयावर दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठी व्याख्यात्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

❋ प्रा. विजयलक्ष्मी कानडे आणि प्रा. पल्लवी बंगाळे यांनी दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'Quantum Computing' या विषयावरील ५ दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला. हा कार्यक्रम ICFAI Foundation for Higher Education, Khalsa College for Women (लुधियाना), Bharati Vidyapeeth (Deemed University) College of Engineering, पुणे व IQAC यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

❋ विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांनी NK Orchid School of Engineering, सोलापूर येथे दि. १३

डिसेंबर २०२५ रोजी 'AI in Education' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सुमारे ६० प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला.

* प्रा. विजयलक्ष्मी कानडे यांनी दि. १५ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान ATAL Online 6 Day FDP ''Quantum Intelligence : Exploring the Convergence of Quantum Computing and Artificial Intelligence'' या विषयावरील कार्यक्रमात सहभाग घेतला. हा कार्यक्रम विद्यावर्धिनीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

* प्रा. पल्लवी बंगाळे यांनी दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान Modern Agile Principles for Transforming Educational Practices" या विषयावरील Department of Computer Engineering, Vishwakarma Institute of Technology (VIT) पुणे यांनी IEEE Pune Section, एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग नोंदविला.

* डॉ. रवींद्र सदाशिवराव आपरे आणि प्रा. रवींद्र हरीभाऊ मुळे यांनी दि. १५ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत ऑफलाइन पद्धतीने PDPM IIITDM, जबलपूर येथे आयोजित WADLA 4.0 – Workshop on Advanced Data Learning & Applications या कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत प्रगत डेटा लर्निंग तंत्रे, मशीन लर्निंग अनुप्रयोग व प्रत्यक्ष केस स्टडीज यांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

## प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग इंजिनिअरिंग विभाग

### सामंजस्य करार

प्रिंटिंग अँड पॅकेजिंग इंजिनिअरिंग विभाग आणि स्क्रीन सेट यांच्यामध्ये प्रिंटेड इलेक्ट्रॉनिक्स या विषयासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

### कार्यशाळेत सहभाग

* प्रो. वर्षा चावरे आणि प्रो. श्रीकला कानडे यांनी दि. १७ ते १९ डिसेंबर २०२५ यादरम्यान AI tools for teaching enhancing pedagogy productivity and engagement या कार्यशाळेमध्ये भाग घेतला.

* भारतीय ज्ञान परंपरा अंतर्गत मास्टर ट्रेनर्स ओरिएंटेशन हे एक दिवसीय सत्र बेंगलोर येथे दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. प्रा. पद्मजा जोशी या सत्रासाठी उपस्थित होत्या. जेष्ठ मार्गदर्शक डॉ. महादेवन यांनी महाविद्यालयात IKS (Indian Knowledge System) हा विषय शिकवताना अधिक चांगल्या पद्धतीने कसा खुलवून विद्यार्थ्यांसमोर मांडता येईल या बाबत उद्‌बोधन केले.

### इस्कॉन आयोजित ऑल इंडिया युथ सिम्पोझियम कार्यक्रमास उपस्थिती

दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी इस्कॉन संस्थेतर्फे ऑल इंडिया युथ सिम्पोझियम आयोजित केले होते. या कार्यक्रमास संचालक श्री. सुनील रेडेकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, प्रा. डॉ. सुनील गायकवाड, प्रा. सोवनी व प्रो. पद्मजा जोशी उपस्थित होत्या. या प्रसंगी राधेश्याम दास लिखित 'विज्डम आय' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. इंडस्ट्री ५.० ला समोर जाताना हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी एक उत्कृष्ठ मार्गदर्शक कसे ठरू शकते याचे विवेचन राधेश्याम दास यांनी केले. संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी सांघिक चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.

### फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये सहभाग

प्रो. पद्मजा जोशी यांनी IKS अंतर्गत 'टेम्पल्स ऑफ तामिळनाडू' हा एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम पूर्ण केला.

### दोन दिवसीय परिषदेमध्ये सहभाग

प्रो. मधुरा महाजन यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित ''What The Flexo'' - Flexo Summit Asia या दोन दिवसीय परिषदेत सहभाग

घेतला. या कार्यक्रमात त्यांनी 'फायरसाइड चॅट' चे यजमानपद भूषवले आणि प्रिंट शिक्षणातील संधी व उद्योगातील महिलांच्या सहभागावर चर्चा केली. ही परिषद पॅकेजिंग आणि प्रिंटिंग क्षेत्रातील Possibilities, Profits आणि People या तीन मुख्य स्तंभांवर आधारित होती.

**फर्स्ट इयर इंजिनिअरिंग विभाग**

* इंजिनिअरिंग सायन्सेस आणि ह्युमॅनिटीज विभागाने दि. १९ डिसेंबर २०२५, शनिवार रोजी सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत पालक-शिक्षक सभेचे आयोजन केले होते. या सभेला एकूण १४३ पालक उपस्थित होते. सभेमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

१) मध्य-सत्र परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचा आणि उपस्थितीचा आढावा.

२) सह-अभ्यासक्रम आणि अतिरिक्त -अभ्यासक्रम उपक्रमांवर चर्चा.

३) नव्याने सुरू केलेल्या स्वायत्त प्रणालीसाठी परीक्षा आणि गुणदान पद्धतीचा आढावा.

४) मार्गदर्शक-मार्गदर्शित (प्रॉक्टर) प्रणालीची अंमलबजावणी आणि भूमिका.

५) सरासरीपेक्षा कमी गुण आणि कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी चर्चा.

६) पालकांचा वर्ग-शिक्षक आणि मार्गदर्शकांशी संवाद.

७) या सत्रानंतर - पालकांच्या अभिप्रायासाठी खुला मंच आणि प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन करण्यात आले.

* एनईपी २०२० नुसारचे सर्व सह-अभ्यासक्रम या सत्रासाठी यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

**एमबीए विभाग**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी संविधानाची सामूहिक शपथ घेतली. विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची रचना, त्याचे महत्त्व व मूलभूत मूल्ये याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) तसेच सहाय्यक समाजकल्याण आयुक्त, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिन रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

**स्पोर्टस विभाग**

**आंतरमहाविद्यालयीन सायकलिंग क्रीडास्पर्धेचे आयोजन**

महाविद्यालयाने दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे शहर विभागीय क्रीडा समिती यांच्या समन्वयाने आंतरमहाविद्यालयीन सायकलिंग क्रीडास्पर्धेचे आयोजन केले. सायकलिंग रोडरेस आणि ट्रॅक इव्हेंट या प्रकारामध्ये पुणे शहर विभागातील एकूण दहा महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. सर्व विजयी खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सायकलिंग ट्रॅक इव्हेंट प्रकारामध्ये सहभागी खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात आली. स्पर्धेसाठी जिजामाता क्रीडा पुरस्कार विजेत्या सौ. दीपाली पाटील आणि दीपाली शिळदनकर ह्या पंच म्हणून उपस्थित होत्या. आर. एम. डी. कॉलेज, वारजेचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. राहुल निकम, अरिहंत कॉलेज, बावधनचे शारीरिक शिक्षण संचालक विक्रम पवळे, आणि आपल्या महाविद्यालयाचे प्रा. आनंद नजण हे उपस्थित होते. या स्पर्धा आयोजनासाठी संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे तसेच पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके, पुणे शहर विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. अय्याज शेख आणि आंतर महाविद्यालयीन सचिव अनिरुद्ध शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले. सायकलिंग क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी, आयोजन सचिव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नामदेव बन्ने यांनी काम पाहिले. ***

## कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### भारतातील अकाउंटन्सी संग्रहालयाचे उद्घाटन

महाविद्यालयामध्ये दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी ''भारतातील अकाउंटन्सी संग्रहालय'' उद्घाटन सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला सीए श्री. केतन सैया, सीए श्री. जीवन सावला, सीए डॉ. फेनिल शाह, सीए श्री. पियुष चांडक, सीए श्री. सचिन मिनियार, सीए श्री. चंद्रशेखर चितळे, सीए श्री. राजेश अग्रवाल, सीए श्री. रेखा धामणकर, सीए श्री. अभिषेक धामणे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांच्या शुभहस्ते या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांच्या मते अकाउंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया हे भारतातील लेखाशास्त्र, वित्त आणि व्यापाराच्या इतिहासाचे जतन व प्रसार करणारे एक महत्त्वाचे ज्ञानकेंद्र आहे आणि याची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून हे म्युझियम महाविद्यालयाच्या प्रांगणात उपलब्ध करून देण्यात आले आहे. सर्व उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांसोबत सविस्तर चर्चा केल्यामुळे विद्यार्थ्यांना एक नवी चेतना मिळाली. या उद्घाटन सोहळाप्रसंगी महाविद्यालयाचा सर्व शिक्षक वृंद उपस्थित होता.

**ग्रंथालय विभाग**

### शांतता ! पुणेकर वाचत आहेत ! पुणे पुस्तक महोत्सव

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी, ''शांतता! पुणेकर वाचत आहेत.'' हा उपक्रम पुणे पुस्तक महोत्सव २०२५ अंतर्गत आयोजित करण्यात आलेला होता. ज्याचा उद्देश वाचन संस्कृती जोपासणे व पुण्याला पुस्तकांची राजधानी म्हणून ओळख देणे असा आहे. अशी माहिती ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी दिली. विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे मोठ्या संख्येने वाचन करून वाचनाला केवळ वैयक्तिक सवय न मानता समाजाला विचारशील, शिक्षित आणि ज्ञानाधारित बनविणे आहे असा संदेशही दिला. या उपक्रमामध्ये प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य रेखा जोशी, समन्वयक डॉक्टर स्वाती जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

### ग्रंथपाल पाजक्ता लोकूर यांचा राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये सहभाग

ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी ''फोर्जिंग न्यू फ्रंटियर फॉर लायब्ररी'' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील ३ दिवशीय परिषदेमध्ये सहभाग घेतला. ही परिषद दि. ३ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये DELNET तर्फे ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली होती.

**NSS विभाग**

### स्वच्छ परिसर व हरित परिसर उपक्रम

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दि. २० डिसेंबर २०२५ रोजी ''स्वच्छ परिसर व हरित परिसर'' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ५० स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी संपूर्ण महाविद्यालयीन परिसर, वाहनतळ तसेच क्रीडांगणाची स्वच्छता केली. तसेच परिसरातील सर्व झाडांना पाणी देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. हा उपक्रम कार्यक्रम अधिकारी स. प्रा. विशाल डावरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी सदस्य स. प्रा. शिवाजी गोडावले, स. प्रा. पूनम बनसोडे, स. प्रा. जान्हवी बैकर व प्राजक्ता सावळे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य रेखा

जोशी, समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण जतन आणि सामाजिक जबाबदारीबाबत जागरूकता निर्माण झाली.

**भारतीय ज्ञानप्रणाली ग्रंथदिंडी मध्ये सहभाग**

महाविद्यालयाच्या NSS विभागाने १३ डिसेंबर २०२५ रोजी मॉडर्न कॉलेज शिवाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या भारतीय ज्ञानप्रणाली ग्रंथदिंडीमध्ये उत्साही सहभाग नोंदविला. ही ग्रंथदिंडी संयोजक श्री. राजेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. आपल्या महाविद्यालयाच्या २८ स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. महाविद्यालयाचे विभागप्रमुख स. प्रा. विशाल डावरे आणि स. प्रा. प्राजक्ता सावळे यांनी ही जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली. या दिंडीची सांगता जंगली महाराज रोड ते फर्ग्युसन महाविद्यालय अशी झाली. फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये असणाऱ्या पुस्तक मेळाव्यामध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक वृंदांनी सहभाग घेतल्यामुळे महाविद्यालयाला रुपये ५,०००/- ची पुस्तके भेट म्हणून मिळाली. उपस्थित विद्यार्थी व शिक्षक वृद्धाला पुस्तकाची एक एक प्रत व सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रंथदिंडीच्या माध्यमातून पुस्तके, हस्तलिखिते आणि ग्रंथ विद्यार्थ्यांसमोर येतील, त्यामुळे वाचनाची आवड वाढेल आणि विद्यार्थी पुस्तकांकडे आकर्षित होतील असे मत ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य रेखा जोशी, समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी या दिंडीमध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षक वृंदांचे अभिनंदन करत असे उपक्रम भविष्यामध्ये राबविण्यात येतील याची हमी दिली.

***


**संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती**

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | |
|---|---|
| Bank A/c Name | : **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : **Bank of Baroda** |
| Branch | : **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : **BARB0SADASH** |
| | **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : **411012009** |

बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल : pvgheadoffice@gmail.com

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### विद्याभवन संकुल

**नर्सरी सहल**

सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ रोजी पूर्व प्राथमिक इंग्रजी आणि सेमी इंग्रजी विभागाचे नर्सरीचे विद्यार्थी झेनॉज प्ले एरिया येथे शैक्षणिक व मनोरंजक सहलीसाठी गेले होते. या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना सुरक्षित इनडोअर प्लेचा अनुभव देणे, त्यांचे मोटर स्किल्स आणि सामाजिक कौशल्य वाढवणे तसेच मजा आणि शिकणे यांचा समन्वय साधणे हा होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या स्लाइड, बॉल पूल, ट्रॅम्पोलाईन, स्पेस थीम गेम्स, वॉल क्लाइम्बिंग आणि सँड प्ले सारख्या अनेक आकर्षक ॲक्टिव्हिटीजचा आनंद घेतला. सर्व खेळ सुरक्षित व विद्यार्थ्यांसाठी अनुकूल वातावरणात आयोजित केले गेले होते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी संपूर्ण वेळ विद्यार्थ्यांसोबत राहून त्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली.

झेनॉज मॅस्कॉटची सरप्राइझ एन्ट्री विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंददायक ठरली. दुपारच्या जेवणात मुलांना पावभाजी आणि नूडल्स देण्यात आले. परतीच्या प्रवासात विद्यार्थ्यांना फ्रुटी आणि हनीबेल केक देण्यात आला. ही सहल सर्व विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय व आनंददायी अनुभूती ठरली!

**छोटा व मोठा शिशु सहल**

बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी पूर्व प्राथमिक इंग्रजी आणि सेमी इंग्रजी विभागाची सहल टिकुजी-नी-वाडी, ठाणे येथे नेण्यात आली होती. गाणी म्हणत विद्यार्थ्यांनी प्रवासाचा आनंद घेतला.

विद्यार्थ्यांचे स्वागत इडली-चटणी आणि पास्ता अशा स्वादिष्ट अल्पोपहार देऊन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध राइड्स, खेळण्याची साधने आणि उपक्रम अनुभवले.

दुपारच्या जेवणात विद्यार्थ्यांनी श्रीखंड-पुरी, भाजी, नूडल्स, डाळ भात यांचा आस्वाद घेतला. थोडा विसावा घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा जोमाने राइड्सचा आनंद घेतला आणि मित्रांसोबत मजा केली.

परतीच्या प्रवासापूर्वी विद्यार्थ्यांना आईस्क्रीम देण्यात आले. ही सहल विद्यार्थ्यांसाठी मैत्री दृढ करणारी, बाह्य विश्वाचा अनुभव देणारी आणि आनंददायी आठवण निर्माण करणारी ठरली.

***

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

**बालदिन**

खेळ गाणी रंगीबेरंगी, हसरे चेहरे झळकती रंगी, बालदिनाची आज मजा खास, चिमुकल्यांनीच उजळला प्रवास.......

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी मोठा शिशु व छोटा शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांनी बालदिन हा मोठ्या उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध मजेदार खेळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. शिक्षकांनीही मुलांना प्रोत्साहन देत कार्यक्रम अधिक रंगतदार केला. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. बाल दिनाचा हा कार्यक्रम मुलांसाठी अविस्मरणीय ठरला, तसेच 'चाचा नेहरू' यांच्या बालप्रेमाची आठवण सर्वांना करून देत सारा दिवस आनंदात व उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ देऊन भेटवस्तूचे वितरण करण्यात आले.

# विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

**वंदे मातरम्**

शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. ३री-४थी च्या विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्'या राष्ट्रीय गीताचे सामूहिकरीत्या गायन केले.

'वंदे मातरम्' या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देशभर सामूहिक गायन करण्यात आले. या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी वंदे मातरम् गीताचा इतिहास विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. श्रीमती शीतल प्रभू यांनी वंदे मातरम् गीताची माहिती सांगितली व सुमारे २५० विद्यार्थ्यांकडून 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन करून घेतले.

**वार्षिक सहल**

मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांची वार्षिक सहल टिकुजी नी-वाडी, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. प्राथमिक विभागातील २७५ विद्यार्थ्यांनी सहलीत भाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी वॉटर पार्क व अम्युजमेंट पार्क मध्ये मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती.

**आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा**

बृहन्मुंबई महानगरपलिका शिक्षण विभाग खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा एन विभाग आयोजित विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. गार्गी मंगेश गोरडे | द्वितीय |
| २री | कु. रजनीकांत संजय सरगर | तृतीय |
| ३री | कु. स्वरूप संतोष तेली | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. इशिता अश्विनकुमार चव्हाण | उत्तेजनार्थ |

आंतरशालेय शिक्षकांसाठी झालेल्या निबंध स्पर्धेत श्रीमती शीतल तुषार प्रभू यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

**मूल्यवर्धन शिक्षक प्रशिक्षण**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण अंतर्गत शहर साधन केंद्र क्रमांक ७, घाटकोपर मूल्यवर्धन शिक्षक प्रशिक्षण दि. १०.११.२०२५ ते २०.११.२०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाला विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतील सर्वशिक्षकांनी टप्प्याटप्प्याने उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण केले.

**संविधान वाचन दिन**

बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधानदिनानिमित्त इ. ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी संविधानाचे सामूहिक वाचन केले. या प्रसंगी ज्येष्ठ शिक्षक श्री. डाफळे यांनी भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. श्रीमती माया वाघमारे यांनी विद्यार्थ्यांकडून संविधानाचे सामूहिक वाचन करून घेतले.

# विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

**राज्यस्तरीय निपुण भारत उपक्रमात सहा. शिक्षिका श्रीमती स्वप्ना गायकवाड यांची उल्लेखनीय भूमिका**

दि. १ डिसेंबर २०२५ रोजी प्रादेशिक विद्याप्राधिकरण, मुंबई येथे निपुण भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर विकसित करण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करणाऱ्या व्हिडिओजचे चित्रीकरण करण्यात आले. या चित्रीकरणासाठी मुंबई जिल्ह्यातील निवडक शिक्षकांची निवड झाली होती, ज्यामध्ये सौ. स्वप्ना दत्तात्रय गायकवाड यांना संधी मिळाली होती. त्यांनी इ. २री साठी मराठी विषयातील अध्ययन स्तर क्रमांक १४- 'चार ते पाच शब्दांचा वापर करून दोन ते तीन सोपी वाक्ये श्रुतलेखनाने लिहितो' आणि इ. ३री साठी गणित विषयातील अध्ययन स्तर क्रमांक १९ - 'शून्य ते वीस या संख्यांचा वापर करून

वजाबाकीची शाब्दिक उदाहरणे सोडवतो' या दोन्ही विषयांवरील मार्गदर्शनात्मक व्हिडिओजचे प्रभावीपणे चित्रीकरण केले. प्रत्येक जिल्ह्यातून ठरविलेल्या विषयांवर आधारित असे सर्व व्हिडिओ राज्यस्तरावर संकलित करून त्यांचा निपुण भारत अभियानाच्या अंमलबजावणीत वापर करण्यात येणार आहे.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### शिक्षकांसाठी ध्यान धारणा वर्ग

शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशालेतील सर्व शिक्षकांसाठी सेमिनार हॉलमध्ये 'मैत्री संबोध ध्यान' या संस्थेतर्फे मेडिटेशन वर्ग घेण्यात आला. या वर्गासाठी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी विभागाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर व समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन उपस्थित होत्या.

चिंता आणि भीती यांनी मनुष्याला पूर्णपणे घेरले आहे. त्यापासून मनुष्याला बाहेर काढायचे असेल तर मेडिटेशन (ध्यान धारणा) जरूरी आहे. हा संदेश या वर्गाच्या माध्यमातून देण्यात आला.

मेडिटेशन केल्याने मन, शरीर, आत्मा शुध्द होतो, शांत होतो आणि आपली सकारात्मकता वाढते, हे समजावून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वर्गामध्ये २० ते २५ मिनिटाचे सर्व शिक्षकांचे मेडिटेशन घेण्यात आले.

### अभिनंदन वार्ता

मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ आयोजित EDU-CON २०२५ शिक्षक सन्मान सोहळा व शिक्षक परिषद हा कार्यक्रम शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी रवींद्र नाट्यमंदिर प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

या शिक्षक सन्मान सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या मुंबईतील निवडक उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. आनंदाची व अभिमानाची गोष्ट म्हणजे या शिक्षक सन्मान सोहळ्यात शिक्षक श्री. रूपेश नथुराम मांडवेकर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

**श्री. रूपेश नथुराम मांडवेकर यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

### संविधान दिन

* बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे नियोजन श्रीमती मीनल भोळे व श्रीमती संगीता बोऱ्हाडे यांनी केले. इ. ९वी ब च्या विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, कर्तव्य व संविधानाबद्दल इतर माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार उपस्थित होत्या. श्रीमती पोतदार यांनी 'संविधान दिन' साजरे करण्याचा उद्देश सांगितला. त्याचबरोबर २६/११ रोजी मुंबई वरील अतिरेकी हल्यातील मृत जवान व नागरिकांना श्रध्दांजली देण्यात आली.

प्रशालेच्या जेष्ठ शिक्षिका श्रीमती मीनल भोळे यांनी संविधान दिनाचे प्रास्ताविक सादर केले. त्यानंतर संविधान गीत ऐकविण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाची शपथ घेतली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

* दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालयात 'संविधान दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षकांनी संविधान निर्मिती, उद्देश व महत्त्व अशा विविध विषयांवर आपले विचार व्यक्त केले. विज्ञान शाखेतील इ. ११वी-१२वी च्या विद्यार्थ्यांनीही आपले विचार मांडले. संविधान उद्देशिकेचे सामूहिक प्रकट वाचन करण्यात आले.

दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. या अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून सर्व देशवासीयांनी एकजुटीने राहण्याचा संदेश देण्यात आला. शहीद झालेल्या अधिकारी व निष्पाप मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात पर्यवेक्षक श्री. मुकुंद मोहिते सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. वंदे मातरम्, भारत माता की जय च्या घोषणेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**सायबर गुन्हे- विद्यार्थी व्याख्यान-NIE उपक्रम**

दि. २५.११.२०२५ रोजी प्रशालेमधील कॉम्प्युटर लॅब मध्ये इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर गुन्हे' कसे होतात याविषयी मार्गदर्शन करणारे व्याख्यान घेण्यात आले.

या व्याख्यानात सायबर गुन्हे कसे होतात, शालेय विद्यार्थी कसे त्यात बळी पडतात, त्यापासून मुलांनी कसे दूर रहावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना त्याविषयीचे टेलिव्हिजनवर डेमो दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांनाही मागदर्शन करण्यात आले.

**विद्यार्थी स्वसुरक्षितता व दक्षता दुसरे व्याख्यान**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशालेत अप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वसुरक्षितता व दक्षता' या विषयावरील दुसरे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी पंतनगर पोलीस ठाणे चे पोलिस उपनिरीक्षक श्री. पारकर साहेब व्याख्याते म्हणून लाभले होते. या व्याख्यानामध्ये श्री. पारकर यांनी जनताभिमुख पोलिसिंग आणि विद्यार्थी भ्रष्टाचाराविरूध्द लढा या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रशालेतील इ. ९वी चे १२० विद्यार्थी उपस्थित होते. त्याचबरोबर पुणे विद्याभवन हायस्कूलचे शिक्षक ही उपस्थित होते.

**आंतरशालेय स्पर्धा**

शिक्षण महर्षी समाजरत्न आबासाहेब दादासाहेब बंडगर यांच्या १६ व्या स्मृतिदिनानिमित्त विविध 'आंतरशालेय स्पर्धा' सरस्वती विद्यानिकेतन, घाटकोपर येथे बुधवार व गुरूवार दि. ३ व ४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थिनी खालील प्रमाणे -

**निबंध स्पर्धा- लहान गट**

| **क्रमांक** | **विद्यार्थिनीचे नाव** | **इ / तु** |
|---|---|---|
| प्रथम | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे | ७वी/क |
| तृतीय | कु. दर्शिता संजय सुतार | ६वी/क |

**चित्रकला पोस्टर स्पर्धा- मोठा गट**

| | | |
|---|---|---|
| उत्तेजनार्थ | कु. पूर्वी राजेश कोरकर | ८वी/अ |

**उद्‌बोधन व्याख्याने**

✻ दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी सेमिनार हॉलमध्ये प्रशालेच्या इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी Achievers Classes चे श्री. प्रफुल देशमाने यांचे 'परीक्षेची तयारी कशी करावी' याविषयीचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. प्रफुल देशमाने यांनी करिअर बद्दलही मार्गदर्शन केले. परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी, कसा अभ्यास करावा, अभ्यासाठी एक वेळापत्रक तयार करून रोज एका विषयाचा अभ्यास कसा व किती वेळ करायचा हे समजावून सांगितले. श्रीमती वायकर यांनी आभार मानले.

✻ दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी प्रशालेच्या सेमिनार हॉलमध्ये प्रा. नारायण गव्हाणे यांचे इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी बीजगणित व भूमिती या दोन विषयांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी कोणते प्रश्न महत्त्वाचे आहेत व परीक्षेत कोणते प्रश्न येण्याची जास्त शक्यता असते ते सांगितले. भूमितीचे प्रश्न सोप्या पद्धतीने कसे सोडवायचे हे समजावून दिले. पटकन उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्याला पदक देऊन गौरवण्यात आले. प्राचार्य श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार यांनी प्रा. नारायण गव्हाणे यांचे आभार मानले व व्याख्यानाची सांगता झाली.

**शालेय विज्ञान प्रदर्शन २०२५-२६**

मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५ रोजी प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात इ. ५वी ते इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. एकूण ८१ प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

प्रदर्शनातील सर्व प्रकल्प पर्यावरणपूरक तसेच नाविन्यपूर्ण होते. इ.५वी ते ९वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहिले व प्रकल्पांचे बारकाईने निरीक्षण केले. याप्रसंगी प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई उपस्थित होत्या.

श्रीमती योगिनी पोतदार यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे कौतुक केले आणि त्यांना संशोधन करण्याविषयी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विज्ञान प्रदर्शनातील प्रकल्पांचे परीक्षण श्रीमती सुनिता वायकर आणि श्री. धर्मराज माने यांनी उत्तमरित्या केले. प्रदर्शनाचे आयोजन श्रीमती पूजा पाटील व श्रीमती रत्नप्रभा पाटील यांनी केले होते.

या प्रदर्शनात प्रथम तीन क्रमांक पटकाविलेले विद्यार्थी खालीलप्रमाणेः

| गट | इ/तु | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| वायु | ९वी/क | कु. धनश्री राजू कांबळे | प्रथम |
| अग्नी | ७वी/क | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे | द्वितीय |
| अग्नी | ७वी/क | कु. अवंतिका सुधीर वरे | द्वितीय |
| अग्नी | ७वी/ब | कु. युगंधरा तुषार तोतरे | द्वितीय |
| जल | ७वी/क | कु. सान्वी सुनील एरंडे | द्वितीय |
| वायु | ८वी/ब | कु. सिया कृष्णा शिंदे | तृतीय |
| वायु | ८वी/ब | कु. ओवी सर्वेश मुरूडकर | तृतीय |
| अग्नी | ८वी/ब | कु. श्रेया श्रीकांत चौघुले | तृतीय |

**तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५-२६**

दि. ८ ते १० डिसेंबर २०२५ रोजी शिक्षण निरीक्षण बृहन्मुंबई उत्तर विभाग आयोजित 'एन' वॉर्ड स्तरीय तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनांतर्गत विविध स्पर्धांमध्ये विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धांमध्ये प्रशालेतील विद्यार्थी व शिक्षकांनी पुढील पारितोषिके प्राप्त केली आहेत.

| | | |
|---|---|---|
| निसर्ग मंडळ | प्रथम क्रमांक | श्रीमती रत्नप्रभा पाटील, श्रीमती नंदिनी साके व विद्यार्थी |
| विज्ञान मंडळ | उत्तेजनार्थ | श्रीमती मनीषा जायभाये व श्रीमती प्रज्ञा गावडे प्रयोगशाळा परिचर |
| वैज्ञानिक साधन | प्रथम क्रमांक | श्रीमती भक्ती माने |
| लोकसंख्या शिक्षण | तृतीय क्रमांक | श्रीमती संगीता बोऱ्हाडे, श्री. पद्माकर शिंगटे व श्री. रमेश घाडगे |

**वार्षिक सहशालेय उपक्रम - २०२५**

प्रशालेत दि. १ ते ३ डिसेंबर २०२५ दरम्यान सहशालेय उपक्रम राबविण्यात आले. दि. १ डिसेंबर २०२५ रोजी पाककला स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेचे नियोजन श्रीमती हेमलता सुर्वे व श्रीमती हेमलता सहेल या शिक्षकांनी केले. पाककला स्पर्धेचे परीक्षण कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. मुकुंद मोहिते व श्री. प्रवीणकुमार कांबळे तसेच श्री. नाना पाटील या शिक्षकांनी केले. याच दिवशी निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निबंध लेखन स्पर्धेचे नियोजन व परीक्षण श्री. नाना पाटील तसेच श्री. अशोक त्रिगुणायत या शिक्षकांनी केले.

दि. २ डिसेंबर २०२५ रोजी मेंदी काढणे, भित्तिपत्रक (पोस्टर मेकिंग) या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मेंदी व भित्तिपत्रक बनविणे या स्पर्धांचे नियोजन श्रीमती नमिता कांबळे व श्रीमती मृदुला धावडे या शिक्षकांनी केले. तसेच मेंदी स्पर्धेचे परीक्षण श्रीमती हेमलता सुर्वे व श्रीमती हेमलता सहेल या शिक्षकांनी केले.

पोस्टर मेकिंग चे परीक्षण श्री. राम प्रकाश मिश्रा व श्री. मुस्तफा शेख या शिक्षकांनी केले.

वरील सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार या सर्व कार्यक्रमांना उपस्थित होत्या. त्यांनी स्पर्धक विद्यार्थ्यांशी संवाद साधला व सर्वांचे कौतुक केले.

**वार्षिक क्रीडा २०२५**

वार्षिक क्रीडा स्पर्धा दि. ४, ५ व ८ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात घेण्यात आल्या.

दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी १०० व २०० मीटर धावणे तसेच लांब उडी या स्पर्धांचे नियोजन श्रीमती हेमलता सुर्वे व श्रीमती हेमलता सहेल या शिक्षकांनी केले. सर्व शिक्षकवृंदांच्या उपस्थितीत स्पर्धा पार पडल्या.

दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी डॉजबॉल स्पर्धा मुलींसाठी तर कबड्डी स्पर्धा मुलांसाठी आयोजित करण्यात आल्या होत्या. डॉजबॉल स्पर्धेचे नियोजन श्रीमती मृदुला धावडे व श्रीमती नमिता कांबळे या शिक्षिकांनी केले. डॉजबॉल स्पर्धेसाठी श्री. प्रवीण कुमार कांबळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. कबड्डी स्पर्धेचे नियोजन श्री. संदीप सुतार तसेच श्री. मुस्तफा शेख या शिक्षकांनी केले तर पंच म्हणून श्री. जितू कुमावत यांनी काम पाहिले.

दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी कबड्डी व डॉजबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरी पार पडल्या. याच दिवशी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व पर्यवेक्षक श्री. मुकुंद मोहिते यांच्या उपस्थितीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, पदके तसेच कबड्डी व डॉजबॉल विजेत्या संघाला चषक देऊन गौरविण्यात आले.

# विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिका: श्रीमती श्रीलता रमेश नायर**

**उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचा निकाल**

दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. इ. ९वी आणि १०वी च्या विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला आणि आत्मविश्वास, स्पष्ट उच्चार, हजरजबाबीपणा, तसेच उत्तम संवादकौशल्य यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाचे परीक्षण श्रीमती राजेश्वरी कोणार आणि श्रीमती संगीता मुंढे यांनी केले. त्यांनी आशय, अभिव्यक्ती, सादरीकरण आणि एकूण प्रभाव या निकषांवर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले. सदर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळवली:

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. गार्गी विजेंद्र क्षीरसागर | प्रथम |
| कु. यशिका मिलिंद पाटकर | द्वितीय |
| कु. अनन्या मनोज पाटील | तृतीय |
| कु. सायली सोमनाथ घुगे | उत्तेजनार्थ |

**संविधान दिवस उत्सव**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी संविधान प्रस्तावना वाचली आणि संविधानिक मूल्ये जपण्याची शपथ घेतली. शिक्षकांनी संविधानाचे महत्त्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका, संविधान स्वीकारण्याची तारीख आणि लोकशाहीचे तीन स्तंभ यांविषयी सविस्तर माहिती दिली. डिजिटल बोर्डचा वापर करून महत्त्वाचे मुद्दे समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानाच्या महत्त्वावर आधारित भाषणेही सादर केली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या अधिकारांविषयी, कर्तव्यांविषयी आणि आपल्या राष्ट्राच्या मार्गदर्शक तत्त्वांविषयी जागरूकता निर्माण झाली. ***

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी
कु. गार्गी मंगेश गोरडे, कु. रजनीकांत संजय सरगर,
कु. स्वरूप संतोष तेली आणि कु. इशिता अश्विनकुमार चव्हाण



मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ आयोजित **EDU-CON** २०२५ शिक्षक सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना सहा. शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर



विज्ञान मंडळ उत्तेजनार्थ पारितोषिक स्वीकारताना
विद्यार्थिनींच्या समवेत उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई,
सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के



निसर्ग मंडळ प्रथम क्रमांक पारितोषिक स्वीकारताना उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, सहा. शिक्षक श्री. धर्मराज माने, श्री. राजाराम बंडगर, श्री. अर्जुन मस्के, श्री. पद्माकर शिंगटे, विद्यार्थिनी व इतर मान्यवर

## ⁕ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁕



लोकसंख्या शिक्षण
तृतीय क्रमांक पारितोषिक
स्वीकारताना
उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई,
सहा. शिक्षक श्री. धर्मराज माने,
श्री. राजाराम बंडगर,
श्री. अर्जुन मस्के,
श्री. पद्माकर शिंगटे,
विद्यार्थी वर्ग व इतर मान्यवर



भित्तिपत्रक (पोस्टर मेकिंग) स्पर्धेत विजेते झालेले विद्यार्थी कु. मैत्रेय महेश कर्पे, कु. ईश्वरी सिकंदर शिंदे, कु. सलेहा फैय्याज रहमानी यांच्या समवेत सहा. शिक्षक श्री. रामप्रकाश मिश्रा व श्री. मुस्तफा शेख



कबड्डी स्पर्धेतील विजयी संघ (इ. १२वी - विज्ञान), समवेत शिक्षक वृंद

# विद्याभवन संकुल
# नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा
### नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन**

शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन अधिकारी श्री. पुरुषोत्तम जाधव, समाजसेवक श्री. सचिन लवटे, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ इ. या उपक्रमात सहभागी झाले होते. अतिथींच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कु. विहान भोसले या विद्यार्थ्याने आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेबांचे विचार व कार्य सांगून आदरांजली वाहिली तसेच काही विद्यार्थ्यांनी गायनातून अभिवादन केले. श्री. पुरुषोत्तम जाधव यांनी आपल्या भाषणात शाळा राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. आनंददायी शनिवार अंतर्गत शाळेच्या रौप्य महोत्सवानिमित्त इ. १ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'कॅरम' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

**विद्यार्थी सुयश**

एस. आय. पी. ॲकॅडमी आयोजित आरिथमॅटिक जिनीयस ऑल इंडिया इंटरस्कूल स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी दुसऱ्या राऊंडमध्ये गोल्ड मेडल प्राप्त केले, व ते तिसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. शिवम आंधळे | १ली |
| कु. अद्वैत जोशी | १ली |
| कु. अद्विक कदम | १ली |
| कु. श्लोक कदम | १ली |
| कु. सानवी भोसले | १ली |
| कु. आराध्या कोडक | २री |
| कु. कृष्णिका आंबवले | २री |
| कु. वेदांश घोडे | २री |
| कु. समर्थ झनकर | २री |
| कु. शिवांश कुंभार | ३री |
| कु. आराध्या परंडवाल | ३री |
| कु. वृद्धी वीर | ३री |
| कु. अद्विक सपकाळ | ३री |
| कु. विराज वीर | ३री |
| कु. शुभ्रा झनकर | ४थी |
| कु. संस्कृती राक्षे | ४थी |
| कु. यश जाधव | ४थी |

**शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धा**

शनिवार दिनांक २२.११.२०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कै. श्री. श. गो. केतकर शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ.१ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पुढील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. शिवन्या औदुंबर भोसले | १ली | प्रथम |
| कु. रुद्रा गणेश गुरव | १ली | द्वितीय |
| कु. सानवी समीर भोसले | १ली | तृतीय |
| कु. कार्तिकी कमलेश काटेकर | २री | प्रथम |
| कु. आराध्या तुषार वंजारी | २री | द्वितीय |
| कु. हर्ष किरण फरांदे | २री | तृतीय |
| कु. स्वरा किशोर जाधव | ३री | प्रथम |
| कु. आर्यन आशिष गोळे | ३री | द्वितीय |

| | | |
|---|---|---|
| कु. स्वराज सुभाष तेरेकर | ३री | तृतीय |
| कु. शुभ्रा सुभाष झनकर | ४थी | प्रथम |
| कु. काव्या किरण जाधव | ४थी | द्वितीय |
| कु. सान्वी प्रतिक पवार | ४थी | तृतीय |
| कु. आन्वी कल्पेश कळंबे | ५वी | प्रथम |
| कु. आरुष बाबासाहेब कानवडे | ५वी | द्वितीय |
| कु. आर्या रवी कदम | ५वी | तृतीय |
| कु. जान्हवी अशोक जाधव | ६वी | प्रथम |
| कु. विहान प्रणय पडवळ | ६वी | द्वितीय |
| कु. सलोनी शंकर करांडे | ६वी | तृतीय |
| कु. हर्षदा सुभाष झनकर | ७वी | प्रथम |
| कु. जान्हवी मोहन डाकवे | ७वी | द्वितीय |
| कु. वेदिका अनिल कणसे | ७वी | तृतीय |
| कु. ओवी अतुल शिंदे | ८वी | प्रथम |
| कु. अनुष्का अरुण तिकोणे | ८वी | द्वितीय |
| कु. श्रृती संतोष गावडे | ८वी | तृतीय |

**SQAAF अंतर्गत शाळेच्या बाह्यमूल्यांकनासाठी पथकाची भेट**

दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी SQAAF अंतर्गत शाळेच्या बाह्यमूल्यांकनासाठी जिल्हास्तरीय पथकाने शाळेस भेट दिली. SQAAF म्हणजेच शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा तपासणी आणि त्यासाठी ठाणे महानगरपालिका, समूहसाधन केंद्र १४, ठाणे मनपा शिक्षण विभाग श्री. सय्यद जावेद अय्युब, प्रभारी श्री. अकील अहमद शेख, मुख्याध्यापक अफरोज अहमद इ. मान्यवरांचे पथक उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी ढोल पथक यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या पथकाने शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यातील विविध बाबी सखोल तपासल्या. शाळा, इमारत, भौतिक सुविधा, परस बाग, प्रयोगशाळा इ. गोष्टींची तपासणी केली. वर्गांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाळेत विविध उपक्रम उत्कृष्टपणे राबविले जातात याचे विशेष कौतुक करून त्यांनी शिक्षकवृंदास शुभेच्छा दिल्या.

**टेनिस स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व नवी मुंबई स्पोर्टस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४थी एन. एम. एस. एल. टी. ए., ठाणे जिल्हा टेनिस अजिंक्यपद स्पर्धा २०२५ दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी वाशी येथे संपन्न झाली. कु. श्लोक कोकरे याची १४ वर्षाखालील वयोगटात दुसऱ्या राऊंडसाठी निवड झाली. विद्यार्थी व मागदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धा**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांना चित्रकला संच बक्षीस देण्यात आला.

| विद्यार्थ्याचे नाव | गट |
|---|---|
| कु. तनुष देवेंद्र पाटील | क |
| कु. स्पृहा संजय नलावडे | क |
| कु. अभिषेक सचिन यादव | ब |
| कु. समीर सामी सय्यद | ब |
| कु. चैतन्य मालोजी वायंगणकर | ब |
| कु. शर्वरी रविराज दाभोळे | ब |
| कु. शनाया सचिन शिंदे | ब |

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

**विद्यार्थ्यांचे सुयश**

रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशन आयोजित विवेकोत्सव २०२५-२६ अंतर्गत आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी कोपरखैराणे येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

| विद्यार्थ्यांची नावे | इ. | गट | क्रमांक | भाषा |
|---|---|---|---|---|
| कु. आरोही भुजबळ | ६वी | छोटा | द्वितीय | मराठी |
| कु. कृपा शितकर | ९वी | मोठा | द्वितीय | मराठी |
| कु. सुहानी कांबळे | १०वी | मोठा | द्वितीय | इंग्रजी |
| कु. कोमल पवार | ९वी | मोठा | तृतीय | इंग्रजी |
| कु. आस्था केळुसकर | ७वी | छोटा | तृतीय | इंग्रजी |
| कु. आस्था तिवारी | ९वी | मोठा | तृतीय | हिंदी |

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धा - अभिनंदनीय पूर्व प्राथमिक मराठी**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागाने आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये गीतेतील १५वा आध्याय (मराठी भाषा) यामध्ये पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके प्राप्त केली.

| विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. प्रियांश समीर भोसले | प्रथम |
| कु. अद्वैत तेजस सुर्वे | तृतीय |

**मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धा (पूर्व प्राथमिक मराठी)**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धेत पूर्व-प्राथमिक मराठी विभागाच्या कु. अथर्व त्र्यंबक जाधव (मोठा शिशु) याने प्रथम क्रमांकाचे सुयश संपादन केले.

**वेशभूषा स्पर्धा (पूर्व-प्राथमिक मराठी)**

गुरूवार दि. १९.११.२०२५ रोजी पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागातील मोठा शिशु वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरण संवर्धन' या विषयावर वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती प्रिया राठोड आणि श्रीमती दर्शना सपकाळ उपस्थित होत्या. शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी नर्सरी व छोटा शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. छोटा शिशु वर्गाचा विषय 'आपले मदतनीस' तर नर्सरी वर्गाचा विषय 'फळे' हा होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. संकेत थळे आणि श्रीमती शीतल बाबर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा आणि विषयानुरुप संवाद यांची सांगड घालून सुंदर सादरीकरण केले. वरील स्पर्धांमध्ये गुणानुक्रमे विद्यार्थ्यांना बक्षिसे प्राप्त झाली.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ※

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com

**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ✻



रामकृष्ण मिशन आणि रामकृष्ण मठ आयोजित विवेकोत्सव आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणारे विद्यार्थी कु. अनिक पिसे व कु. उल्का झगडे यांचे कौतुक करताना मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती नूतन गवांदे



मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करताना मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक आणि कलाशिक्षिका अमृता झोडपे



← वार्षिक क्रीडा महोत्सवानिमित्त क्रीडाज्योत प्रज्वलित करताना प्रमुख अतिथी कु. भक्ती लहामगे

→ संविधान दिनानिमित्त आयोजित प्रभात फेरीमध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षिका



# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

## प्रवेश दिन

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात प्रवेश दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यालयात प्रवेश घेतला तो दिवस सर्वत्र प्रवेश दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेश दिनाची माहिती सांगितली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य सांगितले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. तेजस्वी जोशी यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले .

## संपूर्ण वंदे मातरम् गायन

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताला दीडशे वर्षे पूर्ण झाली, म्हणून विद्यालयात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी वंदे मातरम् या राष्ट्रगानाविषयी ऐतिहासिक महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी वंदे मातरम या गीताचे सामूहिक गायन केले.

## पंडित जवाहरलाल नेहरू जयंती

दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस, 'बालदिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. बाल दिनानिमित्त इ. ५वी ते इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जन्म, बालपण, शिक्षण राजकीय कार्य याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इ. ८वीचा विद्यार्थी कु. मानव तुंगार यांनी केले. कु. वैभव धांडे इ. ८वी या विद्यार्थ्याने उपस्थितांचे आभार मानले.

## बालदिन

दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात बाल दिनाच्या निमित्त अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. धारणे, प्राध्यापक श्री. लहरे यांनी विद्यार्थ्यांसमवेत समवेत बालदिन साजरा केला. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. कार्तिकी राणे हिच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ आणि आयटी डिपार्टमेंट तर्फे विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या तेल, साबण, टूथपेस्ट, बिस्किट पुडा, शॅम्पू या वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. सौ. तेजश्री जोशी यांनी आभार मानले.

## बिरसा मुंडा जयंती जनजाती गौरव दिवस

दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती, जनजाती गौरव दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी भगवान बिरसा मुंडा यांचे प्रतिमेचे पूजन केले. विद्यालयातील शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती सांगितली. इ. ५वी ते १०वी मधील काही विद्यार्थ्यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनावर अभ्यासपूर्ण भाषणे केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी अध्यक्षीय भाषणातून भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कु. साहिल जाधव इ. ६वी याने केले तर कु. गौरव चौधरी इ. ९वी याने उपस्थितांचे आभार मानले.

## संविधान दिन

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आणि संविधानाचे पूजन केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी संविधानानुसार राज्यकारभार कसा चालतो? संविधानाची निर्मिती का करण्यात आली? याविषयी माहिती सांगून संविधानाचे महत्त्व सांगितले. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी संविधानातील विविध कलमांची माहिती सांगितली. संविधान दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करावा असे सांगितले. मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी संविधानाचे अभिवाचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. सौ. तेजश्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

## महात्मा फुले पुण्यतिथी

दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी महात्मा फुले यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषण केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी महात्मा फुले यांचे बालपण, शिक्षण आणि स्त्री शिक्षण विषयक कार्य सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी महात्मा फुले यांच्या जीवनातील विविध प्रसंग कथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्रीमती अर्चना केकान यांनी आभार मानले.

## निबंध स्पर्धा

दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात वनिता विकास मंडळातर्फे निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद वनिता विकास मंडळातर्फे आलेल्या महिला, स्पर्धेत सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी वनिता विकास मंडळातर्फे उपस्थित महिलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. इ. ५वी ते १०वी विद्यार्थ्यांच्या दोन गटात निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत उत्कृष्ट निबंध लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. श्री. अमोल जोशी, यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पुणे विद्यार्थी गृह संस्थेची माहिती वनिता विकास मंडळातील सर्व महिलांना सांगितली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. सौ. तेजश्री जोशी यांनी आभार मानले.

## देणगी वृत्त

दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ नाशिक नॉर्थ यांचे तर्फे अपेक्षित प्रश्न संच वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास रोटरी क्लबचे प्रेसिडेंट श्री. आशिष चांडक, सेक्रेटरी श्री. अनिल साखरे, डायरेक्टर, श्री. परेश महाजन रोटरियन, श्री. पवन पवार देणगीदार आणि रोटरियन, मोनल मेहता रोटरियन, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद इ. १०वीचे विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व रोटरियन यांचे पुष्पगुच्छ देऊन विद्यालयात स्वागत केले. सर्व मान्यवरांच्या हस्ते इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्न संचाचे वाटप करण्यात आले. इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना दिलेल्या या बहुमोल देणगीबद्दल विद्यालयातर्फे देणगीदारांचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

## जागतिक एड्स दिन

दि. १ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात जागतिक एड्स दिनाच्या निमित्त शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी एड्स आजाराची लक्षणे, कारणे आणि उपाय याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

### जागतिक दिव्यांग दिन

दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका श्रीमती सविता चव्हाण यांनी दिव्यांगांच्या समस्या आणि अडचणींवर मात करून जीवनात यशस्वी झालेल्या व्यक्तींची प्रेरणादायी माहिती सांगितली. दिव्यांग व्यक्तीशी संवाद साधताना आपले वर्तन कसे असावे? या विषयी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी दिव्यांग दिनाची सखोल माहिती सांगितली. दिव्यांगांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

### श्री दत्त जयंती

दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात दत्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी श्रीदत्त प्रतिमेचे पूजन केले. शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी श्रीदत्त जन्म कथा सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी श्री दत्त जयंतीचे धार्मिक, अध्यात्मिक महत्त्व आणि श्रीदत्त परंपरेविषयी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. श्रीमती अर्चना केकाण यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

### महापरिनिर्वाण दिन

दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षक वृंद यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रतिमा पूजन करून अभिवादन केले. इ. ५वी आणि ६वीच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आपल्या भाषणातून सांगितले. शिक्षिका श्रीमती सविता चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म, बालपण, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी वाचनाचे महत्त्व सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग कथन केले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घ्यावा' असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. प्रास्ताविक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. श्री. गौरव झुरडे यांनी आभार मानले.

### जागतिक मानव अधिकार दिन

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी मानव अधिकार दिनाविषयी माहिती सांगितली. त्यांनी मानव अधिकार दिवस म्हणजे काय? का साजरा केला जातो? याविषयी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### पालक शिक्षक सभा

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात पालक शिक्षक सभा संपन्न झाली. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद आणि इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. प्रमुख अतिथी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचा गुलाब पुष्प देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सन्मान केला. सर्व उपस्थित पालकांचे गुलाब पुष्प देऊन श्रीमती सविता चव्हाण यांनी स्वागत केले. सौ. तेजश्री जोशी यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी परीक्षा पद्धती आणि मूल्यमापन याविषयी पालकांना माहिती दिली. श्री. गौरव झुरडे यांनी विद्यालयाची शिस्त, नियम याविषयी माहिती दिली. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी विद्यालयात निकाल सुधारणा यासाठी घेतले जाणारे विविध उपक्रम आणि उपाययोजना या विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विद्यालयाची शिस्त तसेच शालेय विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी आवश्यक असलेले कागदपत्र याविषयी माहिती दिली. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी पालकांचे उद्बोधन केले. विद्यार्थ्यांची शिस्त आणि गुणवत्ता विकास याविषयी मार्गदर्शन केले. पालकांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्रीमती अर्चना केकाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**वार्षिक क्रीडा महोत्सव**

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या शुभहस्ते मशाल प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. श्री. गौरव झुरडे यांनी क्रीडा प्रतिज्ञेचे अभिवाचन केले. सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी दैनंदिन जीवनात व्यायामाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. क्रीडा समिती प्रमुख श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

**अभिनंदनीय**

दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी श्री यशवंतराव महाराज देव मामलेदार संस्था नाशिक यांचे वतीने 'सुंदर हस्ताक्षर स्पर्धा' आणि 'चित्रकला स्पर्धा' घेण्यात आल्या. या स्पर्धांत विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. या विद्यार्थ्यांना श्रीमती सविता चव्हाण आणि सौ. अस्मिता बावधनकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेतील बक्षीस पात्र विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

**हस्ताक्षर स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. कुणाल गिरिधर तलवारी | ८वी | प्रथम |
| कु. मानव सुरेश तुंगार | ८वी | उत्तेजनार्थ |
| कु. मानस विष्णू मानभाव | ९वी | उत्तेजनार्थ |
| कु. समीर तुळशीदास राऊत | १०वी | उत्तेजनार्थ |

**चित्रकला स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कु. गणेश प्रल्हाद गावित | ५वी | उत्तेजनार्थ |
| कु. हर्षल अशोक चौधरी | ७वी | उत्तेजनार्थ |
| कु. कुणाल रामजी राठोड | ८वी | उत्तेजनार्थ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!**

***

*** कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक**




दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंद

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
### तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**
**प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

**ग्रंथ दिंडी**

दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. हार फुलांनी सजविलेल्या पालखीत ज्ञानेश्वरी व इतर महत्त्वाचे ग्रंथ ठेवून तळेगावातून ग्रंथदिंडीने मार्गक्रमण केले. वारकरी पोशाखात आलेल्या विद्यार्थ्यांच्या वाचनास प्रेरणादायी घोषवाक्यांनी परिसरात चैतन्य निर्माण केले. यावेळी गावकऱ्यांनी जागोजागी ग्रंथ दिंडीचे स्वागत, पूजन करून व फुगडी खेळून उपक्रमाचे कौतुक केले. ग्रंथ दिंडी संयोजन ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी केले

**संविधान दिन**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे माजी विद्यार्थी व सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ श्री. सुनील खांडबहाले व त्यांचे वडील श्री. शिवाजी खांडबहाले उपस्थित होते. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व प्रमुख अतिथींच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संविधानाचे सामुदायिक वाचन करण्यात आले. प्राचार्यांच्या शुभ हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी संविधान दिनानिमित्त यथोचित भाषणे केली. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर केला. उपशिक्षक श्री. सुकदेव निंबेकर यांनी संविधान निर्मिती, भारतीय लोकशाहीच्या विकासात संविधानाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रमुख अतिथी श्री. सुनील खांडबहाले यांनी विद्यार्थी दशेपासूनच संविधानातील मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरासाठी संविधान तयार करून त्यानुसार वागण्याचा सल्ला दिला. श्री. शिवाजी खांडबहाले यांनी पालक, शिक्षक व विद्यार्थी एकत्र आल्यास सर्वांगीण विकास घडून येतो, हे माझ्या मुलांच्या रूपाने या शाळेने सिद्ध केले आहे. यासाठी मी प्रशालेचा कायम ऋणी आहे, अशी भावना व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी संविधानात मूलभूत हक्कांबरोबरच दिलेली मूलभूत कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. अतिथींचा परिचय श्री. चेतन गोऱ्हे यांनी करून दिला. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

**दिव्यांग सप्ताह**

दि. १ ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत विद्यालयात दिव्यांग सप्ताहानिमित्त चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गीत गायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्यांना प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त खंबाळा येथे विद्यार्थ्यांची रॅली आयोजित करण्यात आली होती. यावेळी तेथे पालकांसमवेत चर्चासत्र आयोजित करून दिव्यांगांच्या समस्या, त्यावरील उपाय योजना, विद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी संस्था व विद्यालयाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची माहिती पालकांना देण्यात आली. तसेच विद्यालयाचा माजी दिव्यांग विद्यार्थी शुभम सोपान मोरे याची मुलाखत घेण्यात आली. विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात विशेष शिक्षिका सौ. वैशाली गावित यांनी पालकांशी संवाद साधून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यावेळी पालकांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत समाधान व्यक्त केले. दिव्यांग सप्ताहाचे संयोजन श्रीमती संगीता कुवर यांनी केले

## अमली पदार्थ विरोधी जनजागृती

दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांनी समाज प्रबोधनाचे काम हाती घेत पालकांपर्यंत, समाजापर्यंत एक चांगला संदेश जावा या उद्देशाने अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमे अंतर्गत व्यसनमुक्तीचे अतिशय सुंदर नाटक सादर केले. यात त्यांनी अमली पदार्थांचे दुष्परिणाम सांगितले. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीच्या घोषणा दिल्या. याप्रसंगी खंबाळा गावचे सरपंच श्री. ज्ञानेश्वर मोरे यांनी नशाबंदी आणि व्यसनमुक्तीसाठी केलेले प्रयत्न गावकऱ्यांसमोर मांडले आणि तरुण पिढीने यापासून परावृत्त कसे व्हावे यासंबंधी मार्गदर्शन केले. ग्रामसेवक श्री. दहिफळे हेही याप्रसंगी उपस्थित होते. त्यांनी संस्काराचे आणि मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. कु. ज्ञानेश्वरी पगार, कु. प्राची मोरे, कु. ऊर्जा पगार, कु. स्नेहा पगार, कु. कार्तिक पगार, कु. ओंकार पगार, कु. आयुष मोरे, कु. विनायक पगार या इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी नाटकात सुंदर अभिनय केला. विद्यार्थ्यांचे नाटक बसवणे आणि अमली पदार्थ विरोधी मोहीम राबवणे यासाठी श्रीमती शिवदे, श्रीमती राजपूत, सौ. अमृतकर, श्रीमती कुवर, सौ. गीत, श्रीमती ठाकूर, श्रीमती भावसार, सौ. धामणे या शिक्षिकांचे सहकार्य लाभले. खंबाळे गावात विद्यार्थ्यांनी साफसफाई देखील केली. गावकऱ्यांचे व सरपंचांचे आभार श्रीमती राजपूत यांनी मानले.

## SPELL B TEAM ची विद्यालयास भेट

दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथील LEAP FORWORD FOR SPELL B च्या गटाने विद्यालयास भेट दिली. या गटाच्या सदस्य सौ. ज्योती वडमारे, नीता भणगे, पायल लांजेकर यांनी उपक्रमात सहभागी विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी संवाद साधून उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. तसेच उपक्रमातील दोन स्तर (LEVEL) पूर्ण केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी LEAPFORWORD कडून विद्यार्थ्यांना लेखनसाहित्य भेट दिले. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती संगीता कुवर यांनी केले.

## अभिनंदनीय

* दि. ५ डिसेंबर २०२५ डे केअर स्कूल, नाशिक येथे जिल्हास्तरीय लंगडी स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी या दोन्ही संघानी चमकदार खेळ करत विजय संपादन केला. विभागीय स्तरासाठी दोन्ही संघांची निवड झाली त्यांना क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे मार्गदर्शन लाभले.

* उपशिक्षिका श्रीमती रक्षा शिवदे यांनी जि. प. अधिकारी कर्मचारी छायाचित्रण स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेसाठी त्यांनी नाशिक गंगा गोदावरी येथे होणाऱ्या सायंआरतीचे छायाचित्र सदर केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

### * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

## ✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), शाखा, नाशिक ✻



दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित ग्रंथ दिंडी समवेत प्राचार्य श्री. शरद कोठावदे, ग्रंथपाल सौ. अर्चना गीत, शिक्षक वृंद व विद्यार्थी




इंग्रजी साक्षरता कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करून 'सुपर हिरो पुरस्कार' प्राप्त करणाऱ्या श्रीमती संगीता कुवर यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी समवेत प्राचार्य श्री. शरद कोठावदे




छायाचित्रण स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल श्रीमती रक्षा शिवदे यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, समवेत प्राचार्य श्री. शरद कोठावदे




जिल्हास्तरीय विजेत्या संघांसमवेत उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे व क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या एकशे पन्नासाव्या जयंतीनिमित्त सर्व शाळांमध्ये 'वंदे मातरम्' या संपूर्ण राष्ट्रीय गीत गायनाचे आयोजन करण्यात आले होते. इ. ४थी ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. 'वंदे मातरम्' गायनाने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत होते. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा इतिहास शिक्षिका कु. महिमा सोनवणे यांनी सांगितला. यावेळी विविध उपक्रम घेण्यात आले.

| इयत्ता | घेण्यात आलेले उपक्रम |
|---|---|
| ५वी | गीतलेखन |
| ६वी | वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचा इतिहास |
| ७वी | वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताची माहिती |

**मतदान मोहीम जनजागृती**

दि. ७ नोव्हेंबर २०२५ सामान्य नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी खालील प्रमाणे विशेष उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सर्व उपक्रमात सहभाग नोंदवला.

| इयत्ता | घेण्यात आलेले उपक्रम |
|---|---|
| ५वी | घोषवाक्य लेखन |
| ६वी | चित्र काढून मतदान जागृती |
| ७वी | रांगोळी मतदान जागृती |

**मूल्यशिक्षण बक्षिस वितरण**

दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी इस्कॉन तर्फे मूल्यशिक्षणावर आधारित परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजक भारतीय इस्त्रो संस्था व इस्कॉन हे होते. या स्पर्धेत विद्यार्थी कु. निर्मल जगताप इ. ६वी याने १३ वे स्थान आणि शाळास्तरावर प्रथम स्थान पटकावले. त्याला स्कूल बॅग व पदक प्रदान करण्यात आले. तसेच शाळेला सहभागानिमित्त सन्मानचिन्ह देण्यात आले.

**शिक्षण दिन**

दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षण दिनानिमित्त सौ. माधुरी अहिरे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणदिनाचे महत्त्व व उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची गरज समजावून सांगितली. विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाबाबत उत्सुकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

**जागतिक दयाळूपणा दिवस**

दि. १३ नोव्हेंबर २०२५ जागतिक दयाळूपणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना करुणा, सहानुभूती, सद्भावना यांचे महत्त्व समजावून सांगितले. शिक्षिकांनी दैनंदिन जीवनात दयाळूपणा कसा आचरणात आणावा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**बालदिन**

दि. १४ नोव्हेंबर २०२५ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. बालदिनाची माहिती शिक्षिका सौ. संजीवनी पाटील यांनी सांगितली. तसेच बालदिनानिमित्त इयत्तानुसार उप क्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रम खालीलप्रमाणे -

| इयत्ता | उपक्रम |
|---|---|
| १ली | कोलाज बनवणे |
| २री | क्रम्बल पेपर्स |
| ३री | फुलं बनवणे |
| ४थी | मास्क बनवणे |
| ५वी | कार्टून कॅरेक्टर बनवणे |
| ६वी | फुलांचा गुच्छ बनवणे |
| ७वी | 'स्वप्नातील जग' पोस्टर बनवणे |

सर्वच विद्यार्थ्यांनी उपक्रमांत सहभाग नोंदवून बालदिनाचा आनंद लुटला. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

## बिरसा मुंडा जयंती

दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी बिरसा मुंडा जनजागृती गौरव दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. शिक्षिका सौ. गौरी बोंबले यांनी विद्यार्थ्यांना बिरसा मुंडा यांच्या चळवळीची माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वारली चित्रे रेखाटली.

## लाला लजपतराय जयंती

दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी लाला लजपतराय जयंतीनिमित्त सौ. दीपा चव्हाण यांनी त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. लाला लजपतराय यांनी इंग्रजांविरुद्ध मोठे आंदोलन केले आणि देशासाठी बलिदान दिले, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यास आदरांजली वाहिली.

## इंदिरा गांधी जयंती

दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिक्षिका श्रीमती गीता तोडी यांनी इंदिरा गांधींच्या सामाजिक व देश कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

## संविधान दिवस

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व शिक्षिका नीलिमा कुलकर्णी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाचे पालन करण्यासाठी जागृती करण्यात आली. तसेच उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांद्वारे संविधानामुळे अधिकार व हक्काची प्राप्ती झाली असून ते जतन करणे आपले कर्तव्य आहे हे सांगण्यात आले.

## नाशिक जिल्हा स्पोर्ट्स नृत्यस्पर्धा

नाशिक जिल्हा स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित नृत्यस्पर्धेत शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्तम कामगिरी केली.

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. आराध्या दिवेकर | ६वी | प्रथम |
| कु. जान्हवी धिवरे | ७वी | प्रथम |
| कु. मृण्मयी दीक्षित | ६वी | तृतीय |

## बुध्दिबळ स्पर्धेतील यश

दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित बुध्दिबळ स्पर्धेत कु. जिया वाघमारे, इ. ५वी या विद्यार्थिनीने कांस्यपदक पटकावले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## महात्मा फुले पुण्यतिथी

दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त शिक्षिका सौ. सुगंधा जगताप यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली.

***

**❊ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ❊**




**इस्कॉन तर्फे मूल्यशिक्षणावर आधारित परीक्षेमध्ये शाळास्तरावर प्रथम स्थान मिळवणारा विद्यार्थी कु. निर्मल जगताप, इ. ६वी**

## ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻



नाशिक जिल्हा स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे आयोजित नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनी कु. आराध्या दिवेकर, इ. ६वी व कु. जान्हवी धिवरे इ. ७वी यांच्या समवेत तृतीय क्रमांक मिळविणारी विद्यार्थिनी कु. मृण्मयी दीक्षित इ. ६वी

दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी बिरसा मुंडा जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस वंदन करताना विद्यार्थी





दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास सहभागी विद्यार्थी



← दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित बुध्दिबळ स्पर्धेत कांस्य पदक मिळवणारी विद्यार्थिनी कु. जिया वाघमारे, इ. ५वी

→ दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना विद्यार्थी



# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ-नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### आंतर शालेय इंग्रजी वक्तृत्व आणि पोस्टर मेकिंग स्पर्धांचे आयोजन

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शाळेमध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बाल दिनाचे औचित्य साधून आंतर शालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमात नाशिक मधील विविध नामांकित शाळांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाची सुरूवात कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमास श्रीमती मनीषा मोरे, प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि श्रीमती भारती पाटील यांच्या सह सर्व मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या प्रोत्साहनाने या कार्यक्रमाची शोभा वाढली.

स्पर्धेचे दोन विभाग होते. पहिला विभाग सहभागींनी प्रभावी भाषणे देणे व दुसरा विभाग पोस्टर मेकिंग अर्थपूर्ण थिमची कलात्मक व्याख्या प्रदर्शित करणे. या स्पर्धांमधील विजेते खालील प्रमाणे -

| स्पर्धा | विद्यार्थिनीचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| वक्तृत्व | कु. स्वरा मालपुरे | प्रथम |
| | कु. मरियम नविद मेमन | द्वितीय |
| | कु. अनुष्का अहिरे | तृतीय |
| पोस्टर मेकिंग | कु. आर्या वाघमारे | प्रथम |
| | कु. शीतल बिराजदार | द्वितीय |
| | कु. नुपूर मोरे | तृतीय |

कार्यक्रमाचा समारोप पारितोषिक वितरण सोहळ्याने करण्यात आला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**❋ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ❋**



दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी आयेजित आंतर शालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींसमवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, आदी मान्यवर

## अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### महात्मा ज्योतीराव गोविंदराव फुले पुण्यतिथी

दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे महान समाजसुधारक, स्त्री-शिक्षणाचे प्रणेते आणि समतेचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतीराव गोविंदराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त यांत्रिक अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अमोल रासने यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रथम वर्ष व्यवस्थापन विभागातील विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा पालवे हिने केले. यानंतर कु. ओमकार चव्हाण याने महात्मा फुले यांचे जीवनकार्य, त्यांचे क्रांतिकारी समाजदर्शन आणि आधुनिक भारतावर झालेला त्यांचा प्रभाव याबाबत सविस्तर व प्रेरणादायी माहिती दिली. कु. वरद वैद्य याने सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. शुभम मुळे आणि कु. मंजिरी बोधाई यांचे विशेष सहकार्य लाभले

### पुणे विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेत अभियांत्रिकी महाविद्यालयास अजिंक्यपद

नुकत्याच पार पडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ठ कामगिरी करत अजिंक्यपद पटकावले. ही स्पर्धा दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी संदीप फाऊंडेशन येथे पार पडली. विविध महाविद्यालयातील संघांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेदरम्यान प्रत्येक सामन्यात महाविद्यालयाच्या संघाने प्रभावी कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम सामन्यात महाविद्यालयाने मखमलाबाद महाविद्यालयाचा पराभव करत नेटबॉल चषकावर आपले नाव कोरले.

महाविद्यालयाच्या संघाचा विद्यार्थी कु. ऋषिकेश डावरे याच्या प्रभावी नेतृत्वाखाली संघाने एकजुटीने व जिद्दीने उत्कृष्ट प्रदर्शन करत विजयाची घोडदौड पूर्ण केली.

कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी विजेत्या संघाचे हार्दिक अभिनंदन केले आणि सातत्यपूर्ण सराव व चिकाटीच्या बळावर भविष्यातही अधिक मोठे यश मिळवावे अशा शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनीही संपूर्ण संघाचे कौतुक करत, 'विजयाची ही भावना कायम ठेवून विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करा,' असे मार्गदर्शन केले. या विजयानंतर महाविद्यालयाने केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही भक्कम पाया रोवला आहे. महाविद्यालयातील सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांची पुण्यतिथीनिमित्त प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. योगिता अहिरे, डॉ. विजय सोनवणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रथम वर्ष विभागातील विद्यार्थिनी कु. शीतल जयकर हिने केले. कु. कृष्णा सिकची आणि कु. यश मिरकर याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य, आणि भारतावरील त्यांचा प्रभाव याबाबत सविस्तर व प्रेरणादायी माहिती दिली.

प्रा. डॉ. संदीप दिवे यांनी आपल्या भाषणात बोलताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि देशातील महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारतातील मागासवर्गीय, दलित, गरीब यांच्या उन्नतीसाठी खर्ची केले. ते एक प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ, न्यायशास्त्रज्ञ होते. त्यांनी केवळ सामाजिक न्याय आणि सामाजिक विषमतेविरुद्धच लढा दिला नाही तर, महिला सक्षमीकरणासाठीही बाबासाहेबांनी खूप काम केले. तसेच आंबेडकर यांना जगातील महत्त्वाच्या विद्यापीठातील मिळालेल्या सन्मानाबद्दल माहिती दिली. तसेच विद्यार्थी दशेत आपल्या आयुष्यात समस्या येतात पण आपण यशाने त्याचे उत्तर दिले पाहिजे हे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनी कु. भाग्यश्री काकड हिने सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. शुभम मुळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**एआयसीटीई - अटल प्रशिक्षण व अध्ययन अकादमी प्रायोजित कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग विषयावरील प्राध्यापक विकास कार्यक्रम**

महाविद्यालयाच्या वतीने एआयसीटीई - अटल प्रशिक्षण व अध्ययन अकादमी प्रायोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग मधील संशोधन विषयक मुद्दे व आव्हाने' या विषयावर दि. १५ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत एक आठवड्याचा प्राध्यापक विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रांमध्ये प्राध्यापक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञांची संशोधन क्षमता वृद्धिंगत करणे हा आहे. या कार्यक्रमामध्ये सध्याच्या संशोधनातील आव्हाने, नव्याने उदयास येणारे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेमधील नैतिक बाबी तसेच विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष उपयोग यांवर सखोल चर्चा केली गेली.

या प्राध्यापक विकास कार्यक्रमामध्ये देशातील नामांकित संस्था व उद्योग क्षेत्रातील ज्येष्ठ प्राध्यापक, तज्ज्ञ आणि संशोधक संसाधन व्यक्ती म्हणून सहभागी झाल्या असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्याने, संवादात्मक सत्रे, प्रात्यक्षिक प्रशिक्षण तसेच संशोधन लेखांवरील चर्चा आयोजित करण्यात आली. डीप लर्निंगधील प्रगती व पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ते मधील नैतिकता, औद्योगिक उपयोग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग मधील करिअर संधी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश या सत्रांमध्ये करण्यात आला होता. या कार्यक्रमामुळे ज्ञानवाटप, सहकार्य व क्षमतावृद्धीला चालना मिळेल, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग क्षेत्रातील दर्जेदार संशोधन व नवकल्पनांना प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. एआयसीटीई च्या उच्च शिक्षणातील अध्यापन, अध्ययन व संशोधनातील उत्कृष्टता वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या या उपक्रमाचा अभियांत्रिकी व व्यवस्थापन क्षेत्रातील प्राध्यापक व संशोधकांना मोठ्या प्रमाणावर लाभ होणार आहे. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणी कार्यक्रम समन्वयक डॉ. व्ही. आर. सोनवणे आणि सह-समन्वयक श्री. जे. वाय. कापडणीस यांनी केले. आमंत्रित तज्ज्ञ वक्ते व सहभागी प्राध्यापकांचे सहकार्य लाभल्याबद्दल आयोजकांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्य : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

**स्पोर्ट्स डे**

गुरुवार दि. २७ आणि शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी पूर्व-प्राथमिक विभागात 'स्पोर्ट्स डे'चे आयोजन करण्यात आले होते. शिशु गटासाठी 'धावणे' व 'बुक बॅलन्सिंग रेस', छोट्या गटासाठी 'धावणे' व 'उड्या मारणे' तर मोठ्या गटासाठी 'धावणे' व 'अडथळा शर्यत' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये अतिशय उत्साहाने सहभाग घेतला.

**बर्ड शो**

मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत संपूर्ण पूर्व प्राथमिक विभागासाठी स्पोर्ट्स हॉल मध्ये बर्ड शोचे आयोजन केले होते. या वेळी विद्यार्थ्यांना निरनिराळ्या रंगांचे पोपट (मकाऊ), इग्वाना, ससे इत्यादी बद्दल माहिती देण्यात आली. सर्व विद्यार्थी हे पाहताना हरखून गेले होते.

**नाताळ**

दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी येणाऱ्या नाताळ निमित्त शिशु गटातील विद्यार्थ्यांनी ख्रिसमस ट्री रंगविले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी सांताक्लॉज व ख्रिसमस ट्रीचे चित्र रंगविले. तर मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी त्रिकोणी कागद हिरव्या रंगाने रंगवून त्यापासून ख्रिसमस ट्री तयार केले.

## प्राथमिक विभाग

**बॉक्सिंग प्रशिक्षण वर्ग**

सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ पासून आर. जे. बॉक्सिंग ॲकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांसाठी बॉक्सिंग प्रशिक्षण सुरू करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली आणि श्री. रोहन जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला.

**चित्रकला स्पर्धा**

गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे -
इ. १ ली - फुलपाखरे आणि फुले
इ. २ री - पतंग
इ. ३ री - झाडे लावा, झाडे जगवा.
इ. ४ थी - माझा आवडता शालेय उपक्रम
इ. ५ वी - इयत्ता १ ली साठी प्रवेश पत्रक
इ. ६ वी - ज्युनियर व सीनियर केजी साठी प्रवेश पत्रक

**मिनी गॅदरिंग**

शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी खुले व्यासपीठ या उपक्रमांतर्गत इ. १ली ते ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी मिनी गॅदरिंगचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य व विविध वाद्यांचे वादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सायली वायाळ व सौ. शिबा अय्यर यांनी केले.

**मनाचे श्लोक पारितोषिक वितरण समारंभ**

शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह आयोजित 'श्रीमती सरला वसंत सोंडूर मनाचे श्लोक पाठांतर व वक्तृत्व स्पर्धा' पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमासाठी सज्जनगड संस्थान येथील श्री समर्थ रामदास स्वामींच्या वंश परंपरेतील परमपूज्य श्री. भूषण स्वामीजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी उपस्थित होत्या. एकूण स्पर्धकांपैकी १६

विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व पुस्तक पारितोषिक म्हणून देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. भूषण स्वामीजींनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

**पाळीव प्राणी व पक्षी प्रदर्शन**

दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळ वृत्तपत्र एन. आय. ई. आणि शाळेच्या सहकार्याने एका पाळीव प्राणी व पक्षी प्रदर्शनाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना मकाऊ, ससा तसेच सरपटणाऱ्या प्राण्यांच्या प्रजातींबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या सुंदर पक्षांना आणि प्राण्यांना पाहण्याचा आनंद घेतला.

**अभिनंदनीय**

दि. ३० नोव्हेंबर २०२५ प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी जी.टी.टी.एफ.तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतला आणि दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी जिंकली. अनेक विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके जिंकली. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे-

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त पदक |
|---|---|
| कु. शिवांश शिंदे | कांस्य आणि रौप्य |
| कु. दर्श देवगावकर | रौप्य |
| कु. गार्गी कुंजीर | सुवर्ण |
| कु. सुहानी दळवी | सुवर्ण |
| कु. संस्कार गायकवाड | कांस्य |
| कु. प्रिन्सी इरपाचे | सुवर्ण व रौप्य |
| कु. शाश्वत कांबळे | कांस्य |
| कु. आरुषी दुडाकिया | कांस्य आणि सुवर्ण |
| कु. इशिता नेवासे | कांस्य आणि रौप्य |
| कु. प्रद्युम्न सुतार | सुवर्ण व कांस्य |
| कु. वैष्णवी कुंभार | कांस्य |
| कु. अमेय बेचवडे | रौप्य |
| कु. मच्छिंद्र पवार | सुवर्ण व रौप्य |
| कु. अमेय पवार | २ रौप्य |
| कु. संबोधी लोंढे | २ सुवर्ण |
| कु. आर्या माने | सुवर्ण व रौप्य |
| कु. ईशान नेरलेकर | कांस्य व २ रौप्य |
| कु. तुर्या अलाटे | कांस्य |

**मराठी हस्ताक्षर स्पर्धा**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी इ. १ ली ते ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

**वार्षिक क्रीडा दिन उत्साहात संपन्न**

दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक क्रीडा दिन प्रसंगी आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट व भारतीय बॉक्सिंग संघाचे प्रशिक्षक सुभेदार जय सिंग ज्ञानदेव पाटील व सौ. धनश्री पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इ. २रीच्या कब बुलबुलच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शालेय ध्वजाचे रोहण करून व क्रीडा ज्योत प्रज्वलनाने झाली. क्रीडा प्रशिक्षक श्री. बलराज शोभाने यांनी मशाल तर कु. दीपलक्ष्मी नाईक यांनी ध्वज घेऊन राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विजेत्या विद्यार्थ्यांसोबत मैदानाची फेरी पूर्ण केली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध मनोरे व लाठीकाठीचे प्रात्यक्षिक शाळेतील क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाने सादर केले. शाळेत होत असलेल्या मल्लखांब, तायक्वांदो अशा विविध क्रीडा उपक्रमाच्या प्रशिक्षकांनी बसवलेल्या या क्रीडा प्रकारांची विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये बॉक्सिंगची लाईव्ह मॅच ही विशेष लक्षवेधी ठरली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आंतरवर्गीय विजेत्या विद्यार्थ्यांचा तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा व शिस्तीचे महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. या कार्यक्रमाला संचालक श्री. सुनील रेडेकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी सौ. ललिता महाजन उपस्थित होत्या. ✻

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.११.२०२५ ते ३०.११.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व



सिंधुताई त्र्यंबक केंघे

**●नाव** - **श्री. सदानंद त्र्यंबक केंघे, पुणे**
**देणगी** - रु. १५,००,०००/-
**दिनांक** - २७.११.२०२५
**निमित्त** - मातोश्री कै. सिंधुताई त्र्यंबक केंघे यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ११)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **श्रीमती मीना मुरलीधर संत, ठाणे**
**देणगी** - रु. ५०,०००/-
**दिनांक** - १.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्रीमती सूर्यमाला र. लुनिया परिवार, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ७.११.२०२५
**निमित्त** - दिवाळीनिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **सौ. मृदुला प्रभाकर चिरमुले, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २५.११.२०२५
**निमित्त** - कै. सौ. नलिनी प्रभाकर चिरमुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (३० नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्री. विकास राजेंद्र भोसले, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २७.११.२०२५
**निमित्त** - कै. रोहिणी राजेंद्र भोसले यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्री. अमोल दिगंबर कड, पुणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - १३.११.२०२५
**निमित्त** - श्री दत्त जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **डॉ. श्रीमती लीला बाळकृष्ण आपटे कळमळकर, घाटकोपर (पूर्व) मुंबई**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १४.११.२०२५
**निमित्त** - कै. डॉ. बाळकृष्ण नारायण आपटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग जिलेबीचे मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**


विठ्ठलराव लिखिते

●**नाव** - **श्रीमती पूर्णिमा विठ्ठलराव लिखिते, पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - १.११.२०२५
**निमित्त** - कै. विठ्ठलराव भगवंतराव लिखिते (मा. वि.) यांचे जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


राजाराम चव्हाण

●**नाव** - **श्रीमती विमल राजाराम चव्हाण, पुणे**
**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - ६.११.२०२५
**निमित्त** - कै. राजाराम तुकाराम चव्हाण यांचे स्मृतिदिनानिमित्त (१ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. प्रदीप हरी जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - १३.११.२०२५
**निमित्त** - कै. श्रीमती माधुरी हरी जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ नोव्हेंबर, १६ डिसेंबर, १६ जानेवारी, १६ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. जयंत नारायण अंबीकर, गोवा**
**देणगी** - रु. ५,१२५/-
**दिनांक** - १८.११.२०२५
**निमित्त** - कै. नारायण रामचंद्र अंबीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

●**नाव** - **सौ. नेहा निरज देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ३.११.२०२५
**निमित्त** - कै. डॉ. चेतन विलास देखणे यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती भाग्यश्री बळवंत करंदीकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ११.११.२०२५
**निमित्त** - कै. बळवंत नारायण करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **डॉ. श्रीमती लीला बाळकृष्ण आपटे, घाटकोपर (पूर्व), मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १४.११.२०२५
**निमित्त** - कै. नारायण विनायक आपटे (४ ऑगस्ट)


नारायण आपटे


राधाबाई आपटे

कै. राधाबाई नारायण आपटे
(२१ जुलै)

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. रामचंद्र श्रीपादराव पुणेकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-


वर्षा पुणेकर

**दिनांक** - १८.११.२०२५
**निमित्त** - पत्नी कै. सौ. वर्षा रामचंद्र पुणेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव** - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - ६.११.२०२५
**निमित्त** - कै. नीळकंठ विठ्ठल लिमये यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्रीमती शोभा जगदीश ताकवले, पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - ७.११.२०२५
**निमित्त** - कै. जगदीश एकनाथ ताकवले यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रशांत रत्नाकर मानकीकर, मुंबई**
**देणगी** - रु. ३,५२१/-
**दिनांक** - १०.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●**नाव** - **श्री. चिंतामण सुदामराव तनपुरे, पुणे**


सुदामराव तनपुरे

**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - १०.११.२०२५
**निमित्त** - कै. सुदामराव बाबुराव तनपुरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (११ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


ॲड.एस.एन.चंद्रचूड

●**नाव** - **ॲड. एस. एन. चंद्रचूड (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. २,००२/-
**दिनांक** - १०.११.२०२५
**निमित्त** - प्रतिमहाप्रमाणे सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

●**नाव** - **श्री. विवेक विनायक शिवदे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ४.११.२०२५
**निमित्त** - कै. विनायक महादेव शिवदे यांचे श्राध्दानिमित्त (५ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **चि. इशांत अमोद साने, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ४.११.२०२५
**निमित्त** - आजोबा कै. अरविंद गोपाळ साने यांचे जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **सौ. सुनिता वसंत वाघ, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ८.११.२०२५
**निमित्त** - कै. इंदुमती संभाजीराव साळुंके यांचे स्मृतिदिनानिमित्त (८ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


वृंदा देशपांडे

●**नाव** - **श्री. राहुल रमाकांत देशपांडे, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,१११/-
**दिनांक** - ८.११.२०२५
**निमित्त** - कै. सौ. वृंदा रमाकांत देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **कु. शुभा श्रीकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - १२.११.२०२५
**निमित्त** - कै. श्रीकृष्ण हरी पळसुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


श्री श्रीधर स्वामी

●**नाव** - **श्री. चंद्रशेखर नरहर भट, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - १२.११.२०२५
**निमित्त** - श्री श्रीधर स्वामी महाराज यांचे जयंतीनिमित्त (४ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. किशोर राजेंद्र कदम, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १८.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विष्णूदास दामोदर शेठ, रायगड**
**देणगी** - रु. १,१११/-
**दिनांक** - २३.११.२०२५
**निमित्त** - कै. यमुनाबाई तुळशीदास शेठ यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


●**नाव** - **श्रीमती कल्पना भानुदास नवरे, मुंबई**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २५.११.२०२५
**निमित्त** - कै. भानुदास नवरे आणि कै. नलिनी नवरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●**नाव** - **श्री. श्रीकांत दामोदर शिखरे, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १५.११.२०२५
**निमित्त** - कै. सौ. वत्सला सुरेश सप्तर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१३ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. मंगला शंकर पित्रे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २५.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. घनःश्याम गंगाधर पारूंडेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २५.११.२०२५
**निमित्त** - कै. गंगाधर सदाशिव पारूंडेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२५ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


मारुती कुलकर्णी

●**नाव** - **श्री. कृष्णाजी मारुती कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २६.११.२०२५
**निमित्त** - कै. मारुती दत्तात्रय कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द ६)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. भगवान बाळासाहेब भोर, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २८.११.२०२५
**निमित्त** - कै. योगेश भगवान भोर यांचे स्मृतीदिनानिमित्त (१ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

### देणगी रु. ५००/- खालील सर्व

●**नाव** - **श्रीमती सुषमा शिवणकर, नागपूर**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १४.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

### वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या

●**नाव** - **श्री. प्रशांत सुहास प्रभुणे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - १.११.२०२५
**निमित्त** - कु. प्रवा प्रशांत प्रभुणे हिच्या वाढदिवसानिमित्त (२ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. तेजस दीपक आमडेकर, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २७.११.२०२५
**निमित्त** - कु. बेला तेजस आमडेकर हिचे वाढदिवसानिमित्त (२९ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. विश्वास रंगनाथ शितोळे (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - २४.११.२०२५
**निमित्त** - कु. अमिश्री विश्वास शितोळे हिचे वाढदिवसानिमित्त (११ जानेवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. मारुती गुणाजी घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १४.११.२०२५
**निमित्त** - चि. निलेश मारुती घडशी याचे वाढदिवसानिमित्त (१५ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.

- **श्री. प्रकाश वामनराव बर्वे, पुणे**
  श्री. मधुसूदन वामनराव बर्वे यांच्या
  सहस्त्रचंद्रदर्शनानिमित्त (८१व्या वाढदिवसानिमित्त)
  तांदूळ ५० कि., गूळ ११ कि.,
  मूग डाळ २० कि., एकूण ८१ कि.
  रु. ६,१७५/-

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल जोशी**

### माहे नोव्हेंबर २०२५

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

- **नाव - सौ. पूनम राजीव नाईक, पुणे**
**देणगी** - रु. १७,०००/-
**दिनांक** - १८.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी

- **नाव - श्री. सचिन प्रभाकर चव्हाण, नाशिक**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २०.११.२०२५
**निमित्त** - चि. ईशान सचिन चव्हाण याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

- **नाव - श्री. प्रकाश प्रभाकर दातार, नाशिक**
**देणगी** - रु. ७,९७९/-
**दिनांक** - २६.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी

- **नाव - श्री. विष्णू गणपत भोरे, नाशिक**
**देणगी** - रु. ४,५००/-
**दिनांक** - १९.११.२०२५
**निमित्त** - कै. आदित्य नवरत्ने यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी

- **नाव - श्रीमती साक्षी मयूर मुंढे, नाशिक**
**देणगी** - रु. ३,२००/-
**दिनांक** - १७.११.२०२५
**निमित्त** - कै. मयूर आनंदा मुंढे यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी

- **नाव - श्री. रत्नाकर रामकृष्ण परांजपे, नाशिक**
**देणगी** - रु. ३,१००/-
**दिनांक** - ४.११.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

- **नाव - श्री. रामकिसन जगन्नाथ निकम, नाशिक**

**देणगी** - रु. २,८५०/-

**दिनांक** - ७.११.२०२५

**निमित्त** - कै. जगन्नाथ कारभारी निकम यांचे पुण्यस्मरणार्थ

**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी

- **नाव - श्री. विशाल नरेंद्र उपाध्याय, ठाणे**

**देणगी** - रु. २,०२१/-

**दिनांक** - १.११.२०२५

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

- **नाव - श्री. केशव वामनराव अहिरे, नाशिक**

**देणगी** - रु. २,००१/-

**दिनांक** - ५.११.२०२५

**निमित्त** - कार्तिक पौर्णिमेनिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

- **नाव - श्री. निनाद दिलीप नांदुर्डीकर, नाशिक**

**देणगी** - रु. १,१०१/-

**दिनांक** - २.११.२०२५

**निमित्त** - कै. दिलीप अनंत नांदुर्डीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ

**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

***

## कै. मा. ब. उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी शाखा, नाशिक येथील खालील शिक्षिकांनी आश्रमस्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी पुढील प्रमाणे देणग्या दिलेल्या आहेत.


श्रीमती सुनंदा ठाकरे


श्रीमती सविता चव्हाण


श्री. गौरव झुरडे

- **नाव - श्रीमती सुनंदा मोतीराम ठाकरे, नाशिक**

**दिनांक** - ४.११.२०२५

**देणगी** - रु. ५०,०००/-

- **नाव - श्रीमती सविता नीलकांत चव्हाण, नाशिक**

**दिनांक** - ११.११.२०२५

**देणगी** - रु. ५०,०००/-

- **नाव - श्री. गौरव अशोक झुरडे, नाशिक**

**दिनांक** - ७.११.२०२५

**देणगी** - रु. २५,०००/-

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, नेरूळ–नवी मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**  **कुलसचिव – श्री. दिनेश मिसाळ**

**दि. १.१२.२०२५ ते २२.१२.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - **पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, घाटकोपर, मुंबई**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - २२.१२.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - नेरूळ शाखेतील गरीब, हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी रु. ९,०००/- (मराठी माध्यम रु. ५,०००/- व इंग्रजी माध्यम रु. ४,०००/-) उर्वरित रु. ३,०००/- ग्रंथालयात पुस्तके खरेदी करण्यासाठी

**नाव** - **श्री. चेतन सिंग, नेरूळ (प), नवी मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २.१२.२०२५
**निमित्त** - नेरूळ शाखेच्या रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त
**विनियोग** - नेरूळ शाखा वाढीसाठी

**नाव** - **श्रीमती साधना पंकज कुलश्रेष्ठ, नेरूळ, नवी मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १९.१२.२०२५
**निमित्त** - नेरूळ शाखेच्या रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त
**विनियोग** - नेरूळ शाखा वाढीसाठी

**नाव** - **श्रीमती सृष्टी सुयश धुमाळ, नेरूळ (प), नवी मुंबई**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - ६.१२.२०२५
**निमित्त** - नेरूळ शाखेच्या रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त
**विनियोग** - नेरूळ शाखा वाढीसाठी

**नाव** - **श्रीमती माधुरी योगेश ताटे नेरूळ, नवी मुंबई**
**देणगी** - रु. १५०/-
**दिनांक** - ६.१२.२०२५
**निमित्त** - नेरूळ शाखेच्या रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त
**विनियोग** - नेरूळ शाखा वाढीसाठी

***

सबंध पुस्तकात पक्षिवर्गाविषयी प्रथम
सर्वसामान्य माहिती देऊन नंतर
लेखकाने प्रत्यक्ष पाहिलेल्या,
निरीक्षिलेल्या अशा सुमारे सत्तर
पक्ष्यांची माहिती या पुस्तकात
पक्ष्यांच्या रंगीत फोटोंसह दिलेली आहे

**पक्षिविज्ञान**

(Birds' Life)

**डॉ. वि. ना. गोखले**
पीएच्. डी., डी. आय. सी. (लंडन)
मूल्य १५०/- रुपये

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**
१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

## ✻ संस्था मुख्यालय, पुणे ३० ✻



दि. २ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. मानसिंग काळंगे यांनी स्वतःच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त संस्थेस रुपये ७१ हजारांची देणगी दिली. श्री. मानसिंग काळंगे यांचे हस्ते देणगीचा धनादेश स्वीकारताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी, समवेत काळंगे कुटुंबीय



संस्थेचे देणगीदार आणि कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स पुणे ९ चे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेस रुपये ५० हजारांची देणगी दिली. याप्रसंगी देणगी पावती देऊन त्यांचे आभार मानताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत संस्था पदाधिकारी व संचालक



दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. प्रकाश ब्राह्मणकर यांनी स्वतःच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त (२१ मे) संस्थेस रुपये ७५ हजारांची देणगी दिली. याप्रसंगी सौ. व श्री. प्रकाश ब्राह्मणकर यांचा सत्कार करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी व संचालक श्री. रमेश कुलकर्णी

**SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016**
**[Publication Date 13.1.2026 Posting Date 15.1.2026]**

**Periodical Post**

## ✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻



दि. २० डिसेंबर २०२५ रोजी संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी कै. सदानंद रामचंद्र जावळेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ त्यांचे इच्छेनुसार त्यांचे चिरंजीव श्री. धनंजय सदानंद जावळेकर यांनी संस्थेस रु. ५०,००१/- ची देणगी दिली.
श्री. धनंजय जावळेकर यांचे आभार मानताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी,
समवेत श्री. धनंजय जावळेकर यांचे मामा श्री. अरविंद भगवंतराव अनासपुरे, सौ. सुनंदा अरविंद अनासपुरे,
श्री. प्रशांत वामनराव अनासपुरे (मा. वि.), सेवक श्री. नंदकिशोर ब्रह्मे व श्री. पोपट शिंदे

**♦ पुणे विद्यार्थी गृह ♦**

▣ पुणे शाखा – (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा – (०२२) २५०६२३२२, फॅक्स : (०२०) २५०६४९३५
▣ नवी मुंबई (नेरूळ) शाखा – (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा – (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरूळ शाखा – (०२५३) २५३४२९१
▣ तळेगाव अंजनेरी शाखा – (०२५९४) २२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया **pvgsamachar@gmail.com** या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of**
**Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge**
**at Maharashtra Mudranshala Chhapkhana,1786, Sadashiv Peth, Pune 411030**
**and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

**समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी**
**महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून**
**पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.**
**संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे**